रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १५७ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ५ नोव्हेंबर २०२४

किंमत ४ ₹

## विमानात बॉम्ब ठेवल्याची अफवा

**पुणे :** इंडिगो एअरलाइन्स कंपनीच्या विमानात बॉम्ब ठेवल्याचा संदेश समाज माध्यमातून प्रसारित करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अफवा पसरविल्याप्रकरणी विमानतळ पोलिसांकडून समाजमाध्यमातील खातेधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत हिमांशू योगेश अगरवाल यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी ॲडमलान्झा ९७५१४ या नावाने समाज माध्यमात खाते वापरणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अफवा परसविणारा संदेश प्रसारित करण्यात आल्यानंतर विमान प्रवाशांना विमानतळावर ताटकळत थांबावे लागले. तपासणी झाल्यानंतर विमानाने उड्डाण केले.

## आज चित्रलेखा पाटील यांचा मुरूडमध्ये प्रचार दौरा

**अलिबाग :** शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख, महाविकास आघाडीच्या अलिबाग-मुरुड-रोहा विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचा मंगळवारी मुरूडमध्ये प्रचार दौरा असणार आहे. दुपारी तीन वाजल्यापासून प्रचाराला सुरुवात होणार आहे.महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील यांनी प्रचाराला सुरूवात केली आहे. मुरूड तालुक्यातील वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन मतदारांना भेटणार आहेत. मंगळवारी (दि. ५) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास तळेखार, चोरढे, सायंकाळी चार •➤ पान २ वर

# आता प्रचाराचं धुमशान!

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**गेल्या आठ दिवसांपासून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सुरू झालेली धडपड.. नंतर अर्ज मागे घेण्यासाठीची मनधरणी.. यामुळे रायगड जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघांतील वातावरण ढवळून निघाले होते. अशा सर्व गोंधळात अखेर सोमवारी (दि. ४) अर्ज मागे घेण्याची वेळही संपली आहे. जिल्ह्यातील ३८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. आता अंतिम उमेदवारांचे चित्र स्पष्ट झाले असून, ७३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. काही ठिकाणी दुरंगी, तिरंगी तर काही ठिकाणी चौरंगी लढती होणार आहेत. २० नोव्हेंबरला मतदान आहे. त्यामुळे आजपासून जिल्ह्यात पुढील पंधरा दिवस प्रचाराचा धुरळा उडणार आहे.**

जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या छाननीमध्ये ९४ उमेदवार वैध ठरले आहेत. त्यामध्ये पनवेल विधानसभा मतदारसंघात १५, कर्जतमध्ये १२, उरणमध्ये १६, पेणमध्ध्ये १२, अलिबागमध्ये २२ व श्रीवर्धनमध्ये १२ तसेच महाडमध्ये पाच उमेदवार वैध ठरले आहेत. सोमवारी (दि. ४) अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया सकाळी अकरा ते दुपारी तीन या वेळेत पार पडली. आता ७३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत, उरण, पेण, अलिबाग, श्रीवर्धन व महाड या सात विधानसभा मतदारसंघात २४ लाख ८८ हजार ७८८ मतदार असून, जिल्ह्यातील दोन हजार ७९० केंद्रांमध्ये २० नोव्हेंबरला मतदानाचा हक्क मतदार बजावणार आहेत. त्यामध्ये युवा, महिला व ८५ वर्षांवरील मतदारांची भूमिका महत्त्वपूर्ण •➤ पान २ वर

- **अर्ज मागे घेण्याची वेळ संपली**
- **सात विधानसभा मतदारसंघांतील उमेदवारांचे चित्र स्पष्ट**

### २८८ विधानसभा जागांसाठी ८२७२ उमेदवार रिंगणात

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली असून, आता २८८ जागांसाठी ८२७२ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, १०,९०० अर्ज दाखल झाले होते. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची उत्सुकता अधिकच तीव्र होत आहे. राजकीय पक्ष आपापल्या राजकीय आघाड्या मजबूत करण्यात व्यस्त आहेत. दरम्यान, सोमवारी (दि.४) दुपारी तीन वाजता उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली. आता कोणत्याही उमेदवाराला अर्ज मागे घेता येणार नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी आता ८२७२ उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी यावेळी एकूण १०९०० उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १६५४ उमेदवारांचे अर्ज फेटाळण्यात आले, तर ९२६० उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आले. त्यापैकी ९८३ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. या सर्व प्रकारानंतर आता ८२७२ उमेदवार उरले असून, त्यांच्या भवितव्याचा फैसला २० नोव्हेंबरला ईव्हीएममध्ये होणार आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा जागांवर मतदान होणार आहे, तर त्याचा निकाल २३ नोव्हेंबरला जाहीर होणार आहे. याबाबत सोमवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली.

## शेतकरी कामगार पक्षाचे शिलेदार 'शिट्टी' चिन्हावर लढणार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**
२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार हे शिट्टी या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे.

शेतकरी कामगार पक्ष हा महाविकास आघाडीचा जरी घटक पक्ष असला तरीसुद्धा शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार बाळाराम दत्तात्रय पाटील (पनवेल), चित्रलेखा पाटील (अलिबाग), अतुल म्हात्रे (पेण), प्रीतम म्हात्रे (उरण), डॉ. बाबासाहेब देशमुख (सांगोला), आशाताई शिंदे (कंधार) हे सर्व उमेदवार शिट्टी या चिन्हावर निवडणुकीला सामोरे जात आहेत. याचबरोबर ''लढेंगे और जितेंगे'' हे घोषवाक्य घेऊन ते मैदानात उतरले आहेत, असे शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या प्रसिद्ध पत्रकामध्ये सांगितले आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत चिन्ह खटारा हे केंद्रीय निवडणूक आयोगाने गोठवल्यामुळे काही काळ शेतकरी कामगार पक्षामध्ये चिन्हाबाबत वेगवेगळ्या चर्चा करण्यात आल्या होत्या. याबाबत काही लोकांनी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्नसुद्धा केला होता. मात्र, आता या सर्वांवर पडदा पडला असून, शेतकरी कामगार पक्षाचे सर्व उमेदवार हे शिट्टी या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत.

## दिलीप भोईर निलंबित

- **पक्षविरोधी कारवाईचा ठपका; खा. धैर्यशील पाटील यांची माहिती**

**। रायगड । प्रतिनिधी ।**
अलिबाग-मुरुड-रोहा विधानसभा मतदार संघात महायुतीच्या अधिकृत उमेदवाराविरोधात भारतीय जनता पार्टीचे बंडखोर दिलीप भोईर यांनी निवडणूक रिंगणात उमेदवारीअर्ज कायम ठेवला. यामुळे पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवून भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश अध्यक्षांच्या सूचनेनुसार भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष आणि अलिबाग मुरुड विधानसभा अध्यक्ष दिलीप भोईर यांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले असल्याची माहिती रायगड जिल्हाध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.



गोंधळपाडा नजीकच्या वृंदावन सोसायटी येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये खासदार धैर्यशील पाटील यांनी पत्रकांबरोबर संवाद साधला. यावेळी सतीश धारप, ॲड. महेश मोहिते, मिलिंद पाटील, उदय काठे, गिरीश तुळपुळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष आणि अलिबाग मुरुड विधानसभा अध्यक्ष दिलीप भोईर यांनी विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज भरला होता. महायुतीच्या धोरणानुसार अधिकृत उमेदवार असतानाही उमेदवारी अर्ज भरल्याने त्यांना वरिष्ठ नेत्यांनी आणि स्थानिक नेत्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंदर्भात समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. परंतु उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशी दिलीप भोईर यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवून पक्षाच्या धोरणाविरोधात कारवाई केल्याने त्यांना भारतीय जनता पार्टीमधून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्यासमवेत असणाऱ्या भाजपच्या कार्यकर्त्यांना देखील याबाबतची समज देण्यात आली आहे. तूर्तास दिलीप भोईर यांच्यावरच निलंबनाची कारवाई करण्यात आली असून कार्यकर्त्यांनी त्यांच्यासोबत राहून काम केल्यास पक्षाला कटू निर्णय घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी •➤ पान २ वर

## आमदारांच्या गावात कचऱ्याचा ढीग

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
विकासाच्या बाता मारणाऱ्या आमदारांच्या गावात कचऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. अनेकवेळा स्थानिकांनी तक्रारी करूनही हा प्रश्न सोडविण्यास आमदार महेंद्र दळवी उदासीन ठरल्याचे बोलले जात आहे. थळमधील कचरा खाडीत टाकला जात आहे. त्याचा नाहक त्रास मासेमारी करणाऱ्यांना होत आहे.




अलिबाग, मुरूड, रोहा विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी करोडो रुपयांचा निधी मंजूर केल्याचे फलक चौका-चौकात लावण्यात आले. काही ठिकाणी मोठा दिखावा करीत कामांचे भूमीपूजन सहा महिन्यांपूर्वी केले. परंतु, प्रत्यक्षात ही कामे आजही कागदावरच असल्याचे चित्र आहे. आमदार दळवी थळ गावातील रहिवासी आहेत. परंतु, त्यांच्याच गावातील अनेक वाड्या पाण्याविना असल्याचे बोलले जात आहे. पाण्यासाठी येथील स्थानिकांना वणवण करावी लागत आहे. ज्या गावात तीन- तीन पाण्याच्या टाक्या बांधल्या. त्या टाक्या आजही कोरड्या आहेत, असे सांगण्यात आले आहे.

आमदारांच्या गावातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कचरा भूमी नसल्याने तो कचरा नवगाव, थळ गावांना जोडणाऱ्या पुलाच्या मागील भागात खाडीमध्ये टाकला जातो. या गावात मोठ्या प्रमाणात कोळी समाज आहे. मासेमारी हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. परंतु, खाडीमध्ये कचरा टाकला जात असल्याने मासेमारी करण्यास मच्छिमारांना प्रचंड त्रास होत आहे. खाडीत टाकलेल्या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असताना, खाडीतील मासळी मिळेनासी झाली आहे. त्याचा छोट्या मच्छिमारांना फटका बसत आहे.

> **थळ गावातील कचरा खारटात टाकला जातो. त्यामुळे मासेमारीवर त्याचा परिणाम होत आहे. अनेकवेळा ग्रामपंचायत व आमदारांकडे काही ग्रामस्थांनी साकडे घातले आहे. तरीदेखील त्याकडे दुर्लक्ष होत आहे.**
> **- स्थानिक ग्रामस्थ, थळ (नाव न सांगण्याच्या अटीवरून)**

आमदारांच्या गावातील कचराभूमीचा प्रश्न गंभीर झाला आहे. तरीदेखील आमदार या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत नाही, अशी ओरड स्थानिकांकडून केली जात आहे. ग्रामपंचायतीलादेखील अनेक वेळा सांगण्यात आले आहे, तरीसुद्धा त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

## 'शिट्टी' चिन्हावर निवडणूक लढवून विजयी होणार : बाळाराम पाटील



**। पनवेल । वार्ताहर ।**
पनवेल विधानसभा १८८ अंतर्गत होणाऱ्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या मार्फत शिट्टी या चिन्हावर मी ही निवडणूक लढवित असून निश्चितच महाविकास आघाडीने महाराष्ट्रभर तसेच रायगड जिल्ह्यासह पनवेल तालुक्यात स्थानिक भूमीपुत्रांसाठी केलेली कामे ही जनतेच्या समोर असल्याने तसेच गेली १५ वर्षे या आमदाराने केले काय? असा प्रश्न पनवेलवासिय विचारत असल्याने माझा विजय निश्चितच असल्याचे प्रतिपादन महाविकास आघाडीचे उमेदवार बाळाराम पाटील यांनी कामोठे येथील महाविद्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केले आहे.

या पत्रकार परिषदेला उमेदवार बाळाराम पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जी.आर.पाटील, काँग्रेस पनवेल जिल्हाध्यक्ष सुदाम •➤ पान २ वर

## शिवसेनेच्या सुरेंद्र म्हात्रेंनी घेतली माघार

### पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार घेतला निर्णय

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील काँग्रेसचे राजाभाऊ ठाकूर यांच्याबरोबरच उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे यांनी सोमवारी (दि.४) दुपारी उमेदवारी अर्ज मागे घेतला. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार यावे, यासाठी वरिष्ठांच्या आदेशानुसार अर्ज मागे घेतल्याचे त्यांनी सांगितले.

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्यापाठोपाठ उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातील शिवसेनेचे सुरेंद्र म्हात्रे यांनीदेखील २९ ऑक्टोबरला •➤ पान २ वर



### पक्षप्रमुखांचे आदेश माझ्यासाठी अंतिम - जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे

**उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे उमेदवारी अर्ज दाखल केला होता. दाखल केलेला अर्ज महाविकास विकास आघाडीतर्फे अधिकृत उमेदवार म्हणून होता. आज महाविकास आघाडीची बैठक झाली. त्यात ठरल्यानंतर मला पक्षप्रमुखांनी फोन केला व अर्ज मागे घेण्यास सांगितले. ज्यांनी मला बोलावून अर्ज भरायला सांगितला, त्यांनीच अर्ज मागे घ्यायला सांगितला म्हणून मी अर्ज मागे घेतलाय. पुढील मातोश्रीचा आदेश मला मान्य असेल, आम्ही पक्षात आलो, हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांनीच. त्यामुळे त्यांचा जो विचार आहे, तो आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. जो मातोश्री व पक्षप्रमुखांचा आदेश असेल, तोच सर्व कार्यकर्त्यांना मान्य असेल. त्यांनाच पाठिंबा असेल, असे मत सुरेंद्र म्हात्रे यांनी व्यक्त केले.**

**आजचा अग्रलेख**
**वाघावरून उतरताना**

### वेधक
## एसटी बसमधून गांजाची तस्करी

**पुणे :** एसटी बसमधून गांजाची तस्करी करण्याचा डाव खडकी पोलिसांनी हाणून पाडला. पोलिसांनी जळगाव येथील दोघांना ताब्यात घेत त्यांच्याकडून साडेदहा किलो गांजा जप्त केला आहे. पोलिसांनी जाबीर भिकन खाटीक (३२, रा. वाघाडी) आणि सुहेल अली जहीर अली शहा (२६, रा. चोपडा) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक लाख ६० हजार रुपयांचा १० किलो ६१० ग्रॅम गांजा जप्त केला. या दोघांविरुद्ध खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आग्रा येथे हवाई दलाचे विमान कोसळले

**। आग्रा । वृत्तसंस्था ।**
उत्तर प्रदेशातील आगरा येथे सोमवारी (दि. ४) एक मोठी दुर्घटना घडली. हवाई दलाच्या विमानाने आकाशातच पेट घेतला. ही आग वाढल्यानंतर विमान एका शेतात कोसळले. दरम्यान, अपघातावेळी विमानातील पायलट आणि आणखी एका व्यक्तीने उड्या मारून आपला जीव वाचवला. विमान कोसळताच आग भडकली. ही दुर्घटना आग्रा येथील कागारौल भागातील सोंगा गावाजवळ घडली.

घटनेची माहिती मिळताच प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांचे अधिकारी घटनास्थळी दाखल



- **पायलटसह दोन जणांनी घेतल्या शेतात उड्या**

झाले आहेत. स्थानिक पोलिसांसह घटनास्थळी पोहोचले. विमान शेतात कोसळताना पाहून गावातील लोकही तेथे पोहोचले. या दुर्घटनेनंतर •➤ पान २ वर

## बस दरीत कोसळून ३६ प्रवाशांचा मृत्यू

**। उत्तराखंड । वृत्तसंस्था ।**
उत्तराखंडच्या अल्मोडाच्या मार्चुलाजवळ भीषण अपघात झाला. बस नैनीडांडाच्या किनाथहून प्रवाशांना घेऊन रामनगरच्या दिशेने चालली होती. बस सारड बँड येथे नदीनजीक आली आणि अनियंत्रित होऊन दरीत कोसळली. यात ३६ जण ठार झाले आहेत. तीन जखमींना एअरलिफ्ट करुन ऋषिकेश एम्स येथे आणण्यात आले आहे.



अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, रेस्क्यू अभियान पूर्ण झालं आहे. या बसमध्ये ४२ प्रवासी होते. उत्तराखंडच्या अल्मोडा येथे सोमवारी सकाळी हा भीषण अपघात झाला. या अपघातात बसचं पूर्णपणे नुकसान झाले. स्थानिकांनी लगेच पोलिसांना या घटनेची माहिती दिली. अपघाताची माहिती मिळताच एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या टीमला घटनास्थळी बोलवण्यात आलं. जखमींना बाहेर काढून रुग्णालयात पोहोचवण्यात आलं आहे. अल्मोडाच्या एसएसपीसह अनेक मोठे अधिकारी घटनास्थळी उपस्थित झाले. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी बस दुर्घटनेवर दु:ख व्यक्त केलं. त्यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी चार-चार लाख आणि जखमींना १-१ लाख रुपयाची मदत जाहीर केली आहे. सीएम धामी यांनी पौडी आणि अल्मोडाच्या आरटीओ प्रवर्तनला निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.

## रश्मी शुल्का यांची बदली

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आल्यानंतर पोलीस महासंचालक पदाचा तात्पुरता कारभार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. पुढील आदेश येईपर्यंत पोलीस महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार हा फणसाळकर यांच्याकडे असणार आहे.

भारतीय पोलीस सेवेच्या १९८९ तुकडीतील अधिकारी असलेले फणसळकर हे पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी आहेत. मुंबई पोलीस दलातील सुमारे ५० हजार पोलिसांचे ते नेतृत्व करत आहेत. फणसळकर त्यापूर्वी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबईच्या व्यवस्थापकीय संचालकपदावर ते कार्यरत होते. त्याआधी फणसळकर ठाण्याच्या पोलीस आयुक्तपदी कार्यरत होते. सुमारे पावणेदोन वर्षे त्यांनी ठाणे शहर आयुक्तपदाचा कार्यभार सांभळला. कोरोना काळात जिवाची बाजी लावून जनतेचा जीव वाचवणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी पुढाकार घेतला होता.

याशिवाय त्यांनी मुंबईतही महत्त्वाच्या पदांवर यापूर्वी काम केले आहे. मुंबईच्या वाहतूक विभागाचे सहआयुक्त म्हणून फणसळकर यांनी काम केले होते. मुंबईत पोलीस सहआयुक्त (प्रशासन) या पदाचाही कार्यभारही •➤ पान २ वर

### रायगडची पहिली तरुण संशोधक विद्यार्थिनी
## माणगावची तृणाली शाहची नासामध्ये निवड

**। सलीम शेख ।**
**। माणगाव ।**
माणगाव शहरातील विकास कॉलनी येथे राहणारी तृणाली अनिल शाह या तरुणीची ज्युनिअर शास्त्रज्ञ म्हणून अमेरिकेच्या नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (नासा) या अंतराळ संशोधन संस्थेमध्ये नुकतीच निवड करण्यात आली आहे. जागतिक पातळीवर निवड झाल्याने तिचा अशोकदादा साबळे प्रतिष्ठानतर्फे ॲड. राजीव साबळे यांनी माणगाव भूषण पुरस्कार देऊन गौरव केला. लवकरच ती जपान येथे प्रशिक्षणासाठी प्रयाण करणार आहे. अशा प्रकारे नासामध्ये निवड होणारी तृणाली ही रायगड जिल्ह्यातील पहिली आणि महाराष्ट्रातील दुसरी तरुण संशोधक ठरली आहे.



तृणाली शाह जपान येथील नागोया विद्यापीठात गेस्ट रिसर्चर म्हणून पाच महिने संशोधक म्हणून काम करणार आहे. त्यानंतर ती अमेरिकेतील नासा या मुख्य संशोधन केंद्रातील कार्यालयात हजर होणार आहे. या प्रशिक्षण काळात तृणाली पृथ्वी आणि सूर्य यांच्यामधील प्रभावाचा मानवी जीवनावरील होणारे परिणाम यावर संशोधन करणार आहे. या दोघांमधील अंतरिक्ष परिणामाने पृथ्वीवरील जीवसृष्टीवर सूक्ष्म आघात होत असल्याने जीपीएस कार्यप्रणालीमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. इंधन वाहिन्यांवर दुष्परिणाम होऊन त्यांची गळती होते. या दोन्ही प्रक्रिया निरंतर सुरू राहण्यासाठी संशोधन करणार आहे.

दक्षिण आणि उत्तर ध्रुव या चुंबकीय क्षेत्रात असणाऱ्या जगातील देशांमधील वेगवेगळ्या डान्सिंग लाईट दिसणाऱ्या सूर्याच्या सूक्ष्म कणांच्या भूचुंबकीय प्रदेशातील घटनांचा अभ्यासपूर्ण माहितीचे संकलन करून संशोधन करणार आहे. हे डान्सिंग लाईट आपल्याकडे दिसणाऱ्या इंद्रधनुष्यसारखे परंतु डोळ्यांचे पारणे फेडणारे वेगवेगळ्या आकाराचे असतात. ते पहाटे दिसत असतात. मात्र, आपल्याकडे दिसत नाहीत. तसेच भारताने प्रक्षेपित केलेले, सूर्याजवळ गेलेल्या 'आदित्य एलवन' चा अभ्यास •➤ पान २ वर



# महाड-रायगड रस्त्याचे काम निकृष्ट

## ■ कॉंक्रिटखालील माती खचल्याने भगदाड; अपघात होण्याची दाट शक्यता

। महाड । प्रतिनिधी ।

महाड-रायगड रस्त्याचे काम गेली दोन वर्षांहून अधिक काळ संथ गतीने सुरू असून, आजही अपूर्णावस्थेतच आहे. यातच या रस्त्याच्या निकृष्टपणाचा नमुना कोंझर गावाजवळ समोर आला आहे. कॉंक्रिटखालील माती खचल्याने भगदाड निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता स्थानिक ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.



मुंबई-गोवा महामार्ग आणि महाड-महाप्रळ-पंढरपूर या रस्त्यांप्रमाणेच किल्ले रायगडाकडे जाणारा महाड-रायगड मार्गदेखील गेली दोन वर्षांहून अधिक काळ अपूर्ण अवस्थेतच आहे. सुरुवातीला हे काम एल.बी. पाटील कंस्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले होते. मात्र, या कंपनीकडून कामाला वेग दिला गेला नसल्याने शासनाने अक्षय कंट्रक्शन कंपनीला हे काम दिले. दोन वर्षांपासून अक्षय कंट्रक्शन या रस्त्याचे काम करत आहे. शिव पुण्यतिथी, शिवराज्याभिषेक, शिवजयंती आणि इतर सोहळ्यांसाठी किल्ले रायगडावर पर्यटकांची मोठी गर्दी असते. लाखो शिवभक्त किल्ले रायगडावर दाखल होत असतात. वारंवार होणारी वाहतूक कोंडी आणि लागणारा वेळ याकरिता रस्त्याच्या रुंदीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेऊन हे काम हातात घेतले होते. मात्र, अक्षय कंट्रक्शनकडून महाड रायगड रस्त्याबरोबरच महाप्रळ पंढरपूर या रस्त्याचे कामदेखील घेण्यात आले आहे. यामुळे दोन्ही रस्ते अपूर्ण अवस्थेत आहेत.

महाड-रायगड मार्गावरील आणि महाप्रळ मार्गावरील गावातील नागरिकांचे मोठे हाल झाले आहेत. गडावर होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी अनेक मान्यवर आणि शिवप्रेमी दाखल होत असतात. अशावेळी शासनाकडून या रस्त्यांची कामे त्वरित करून घेण्यासाठी कंट्रक्शन कंपनीकडे तगादा लावला जात आहे. यामुळे दिवस-रात्र काम करून कंट्रक्शन कंपनी गुणवत्तेकडे दुर्लक्ष करून काम करून घेत आहेत. याचा प्रत्यय कोंझर गावाजवळ आला आहे. या ठिकाणी श्री शिवराज्याभिषेकापूर्वी घाईघाईने कॉंक्रिटीकरणाचे काम केले गेले होते. यामुळे या ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले आहे. झालेले कॉंक्रीट आणि त्या खालील मातीचा भराव यामध्ये पोकळी निर्माण झाली आहे. माती खचली गेली असल्याचे स्पष्ट दिसत असून, रस्त्याच्या दोन्ही बाजूचा भाग दिसून येत आहे.

> गेली दोन वर्षांपासून या रस्त्याचे काम सुरू आहे. हे काम उत्तम दर्जाचे व्हावे आणि स्थानिक नागरिकांच्या सध्या सुरू असलेल्या हालअपेष्टा दूर व्हाव्यात, हीच शासनाकडे विनंती.
>
> \- परेश पवार, ग्रामस्थ

> कोंझर गावाजवळ कॉंक्रीट आणि मातीचा भराव यामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. यावरून वाहने ये-जा करत असली तरी भविष्यात रस्ता खचून मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.
>
> \- अविनाश चव्हाण, स्थानिक ग्रामस्थ

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अषिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. यशवंत सिताराम सुर्वे, रा. सातिर्जे-कातळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | १४८/५ | ०-२४-१० | ४.८१ |
| | | पो. ख. ०-०२-२० | |
| | | ०-२६-३० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अषिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेचआमच्या अषिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख :५/११/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

पान १ वरून

## आज चित्रलेखा पाटील यांचा मुरूडमध्ये प्रचार दौरा

वाजण्याच्या सुमारास वळके, साडेचार वाजण्याच्या सुमारास साळाव, मेढेखार, सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास कोर्लई येथील मनोहर भोपी यांच्या घरासमोरील पटांगण, मांडला तसेच काकळघर येथील लाल गोरमे यांच्या घरासमोर, भोईघर परिसरात मतदारांना भेटणार आहेत. भोईघरबरोबरच काशीद येथील सरोज दिवेकर यांच्या निवासस्थानी जाणार आहेत. सायंकाळी साडेसात वाजेपर्यंत हा प्रचार दौरा असणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## आता प्रचाराचं धुमशान!

ठरणार आहे. यंदा मतमोजणी २३ नोव्हेंबरला होणार आहे. यावर्षी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जनजागृती केली जाणार आहे. जिल्ह्यात आदिवासी मतदार मोठ्या प्रमाणात आहेत. मतदानाच्या दिवशी त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. त्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. जिल्ह्यामध्ये १८ ते १९ वयोगटातील ५५ हजार ८९३ मतदार, ८५ वर्षांपुढील ३५ हजार ८६३, दिव्यांग १३ हजार १९१ तसेच अनिवासी भारतीय २३३ मतदार आहेत. जिल्ह्यातील पेण व रोहा या ठिकाणी एकूण १० संवेदनशील केंद्र आहेत. ४९ मतदान केंद्रांवर मोबाईल नेटवर्कची समस्या आहे. त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

**मतदान केंद्रावर असणार सुविधा**

जिल्ह्यात बॅलेट युनिट सहा हजार २००, कंट्रोल युनिट तीन हजार ४०५ व व्हीव्ही पॅट तीन हजार ६८१ अशा एकूण १३ हजार २८६ मशीन असून, १७ हजार २४९६ कर्मचाऱ्यांचे नियोजन केले आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. मतदान केंद्राची पाहणी केली जाणार असून, जिल्ह्यातील मतदारसंघांत बॅलेट युनिट, व्हीव्ही पॅट मशीन देण्यात आले असून, स्ट्राँग रुममध्ये ते ठेवण्यात आले असल्याचे जावळे यांनी सांगितले.

## दिलीप भोईर निलंबित

लागेल,असे स्पष्ट मत खा. पाटील यांनी मांडले.

अलिबाग विधानसभा मतदार संघात तयार झालेली परिस्थिती २०१९च्या निवडणुकीत उरण मतदार संघात तयार झाली होती. त्यावेळी भरतीय जनता पार्टीने महेश बालदी यांच्यावर कोणतीच कारवाई केली नव्हती. कारण त्यांच्या पाठीवर भाजपच्या बड्या नेत्याचा वरदहस्त होता. दिलीप भोईर यांनी देखील भाजप वाढविण्यासाठी आकाश पाताळ एक करून आमदारकी लढविण्याचे स्वप्न पहिले आणि उमेदवारी अर्ज भरला. परंतु बड्या नेत्याचा वरदहस्त नसल्याने त्यांच्यावर भाजपने निलंबनाची कारवाई केली असल्याची चर्चा मतदारसंघात ऐकू येत आहे.

सत्तेची गणिते काबीज करण्यासाठी शिंदे शिवसेना, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट आणि भारतीय जनता पार्टी यांनी महायुती साकारली. या महायुतीला रायगड जिल्ह्यातील अलिबाग-मुरुड विधानसभा मतदार संघात सुरुंग लागला आहे. महेंद्र दळवी यांना महायुतीने अधिकृत उमेदवारी दिली परंतु भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी आमदारकी लढविण्याचा हट्ट कायम ठेवला. उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशी दिलीप भोईर निवडणुकीतून माघार घेतील यासाठी महेंद्र दळवी यांनी फिल्डिंग लावली होती. परंतु त्यांना त्यात यश आले नाही. दिलीप भोईर निवडणूक रिंगणात असल्याने महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांच्या पायाखालची वाळू सरकली होती. त्यांनी वरिष्ठांच्या मदतीने भाजपच्या दिलीप भोईर यांच्यावर पक्षाने कारवाई करण्यासाठी देव पाण्यात बुडवले होते. त्यांच्या प्रयत्नांना यश आले. पक्षीय धोरणाविरोधात राजकीय हालचाली केल्याने दिलीप भोईर यांच्यावर पक्षाने निलंबनाची कारवाई केली आहे.

दिलीप भोईर यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना केलेल्या शक्तिप्रदर्शनाने महायुतीच्या नेत्यांची धडधड वाढवली होती. भाजप उरण पॅटर्न राबविण्याच्या तयारीत असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत होते. यामुळे दिलीप भोईर यांच्यावर निवडणुकीपूर्वी कारवाई होणार नाही, असे चित्र होते. परंतु शक्तिप्रदर्शनावेळी जमलेली गर्दी पाहून महेंद्र दळवी यांनी आपल्या प्रचाराची वाट वाकडी करून त्यांनी दिलीप भोईर यांना टार्गेट केले आणि त्यात ते जिंकले. दिलीप भोईर यांच्यावर भारतीय जनता पार्टीने कारवाई केली असली तरी विधानसभा निवडणुकीमध्ये निश्चितपणे दिलीप भोईर आता महेंद्र दळवी यांना राजकीय शत्रू मानून त्यांच्या विरोधात मतदारसंघात रान पेटवतील, यात तिळमात्र शंका नाही. यामुळे शिंदे गटाच्या मतदारांना महेंद्र दळवी यांना आपलेसे करण्यासाठी नव्या क्लुप्त्या शोधाव्या लागणार आहेत.

## शिवसेनेच्या सुरेंद्र म्हात्रेंनी घेतली माघार

अर्ज दाखल केला होता. शेकाप, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट) हे महाविकास आघाडीतील घटक पक्ष आहेत. राज्यात महायुतीचे सरकार आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणण्यासाठी अलिबागमधील उमेदवारी शेतकरी कामगार पक्षाला देण्यात आली आहे. त्यामुळे सुरेंद्र म्हात्रे यांनी सोमवारी अर्ज माघार घेतला. पक्षाच्या आदेशानुसार अर्ज मागे घेतला असल्याचे ते म्हणाले.

## 'शिट्टी'चिन्हावर निवडणूक लढवून विजयी होणार : बाळाराम पाटील

पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, पनवेल शहर जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, समाजवादी पक्ष जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, मा.नगरसेवक शंकर म्हात्रे, प्रमोद भगत, शेकाप कामोठे कार्याध्यक्ष गौरव पोरवाल आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उमेदवार बाळाराम पाटील यांनी महायुतीचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांनी गेल्या १५ वर्षात केले काय? असा सवाल करत पनवेल एस.टी.स्टँण्डचा प्रश्न प्रलंबित, रस्त्यावर पडलेले खड्डे, वाढती ट्रॅफिक, पाण्याचा प्रश्न, टॅक्सचा प्रश्न, नैनाचा प्रश्न आदी प्रश्न सोडविण्यास हे आमदार अपयशी ठरले असून आगामी काळात जनता यांना घरी बसवेल, असेही त्यांनी सांगितले. आज जरी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे उमेदवार देण्यात आला असला तरी वरिष्ठ पातळीवर नेते मंडळींशी चर्चा होवून ते सुद्धा आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील असा विश्वास बाळाराम पाटील यांनी व्यक्त केला आहे. शिट्टी हे चिन्ह घराघरात पोहोचविण्यासाठी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी आजपासून कामाला लागले असून किमान तीन वेळा आम्ही प्रत्येक व्यक्तीशी संपर्क साधू असेही त्यांनी सांगितले. ही निवडणूक जिंकण्याच्या इर्षेनेच आम्ही मैदानात उतरलो असून कोणत्याही परिस्थितीत विजय हा आमचाच असेल, असेही बाळाराम पाटील यांनी सांगितले.

यावेळी काँग्रेस पनवेल जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील यांनी सुद्धा काँग्रेस पक्ष बाळाराम पाटील यांच्या पाठीशी ठाम उभा असून दिवस रात्र एक करून विजय संपादन करू, असेही त्यांनी सांगितले. तर मराठा समाजाचे नेते गणेश कडू यांनी सुद्धा जरांगे पाटील जो निर्णय देतील तो आम्हाला मान्य आहे, मराठा समाज सुद्धा बाळाराम पाटील यांच्या पाठीशी ठाम उभा राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

## रश्मी शुल्का यांची बदली

त्यांनी सांभाळला आहे. फणसळकर यांची पहिली नियुक्ती अकोल्याचे अतिरिक्त अधीक्षक म्हणून झाली होती. त्यानंतर त्यांनी वर्ध्याचे व परभणीचे पोलीस अधीक्षक म्हणून काम केले. नाशिकचे उपायुक्त ही त्यांची आयुक्तालयातील पहिली नियुक्ती होती. त्यानंतर, दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी कार्यभार सांभाळला होता.

## आग्रा येथे हवाई दलाचे विमान कोसळले

तातडीने चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच दुर्घटनेच्या सखोल चौकशीसाठी संबंधित सर्व संस्थांना सतर्क करण्यात आले आहेत. संरक्षण अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, हे मिग-२९ विमान होते. याने पंजाबमधील अदमपुर येथून उड्डाण घेतले होते. विमान रूटीन एक्सरसाइजसाठी आगरा येथे जात होते. दुर्घटनेचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## माणगावची तृणाली शाहची नासामध्ये निवड

करणार आहे. अभ्यासात अत्यंत हुशार असलेल्या तृणालीचे बारावी विज्ञानपर्यंतचे शिक्षण माणगाव येथे झाले. त्यानंतर पुणे आणि मुंबई विद्यापीठात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण भौतिक शास्त्र या विषयात पूर्ण केले. त्यानंतर अंतराळ हवामान या विषयात स्पेस केंद्र इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जीओ मॅग्नेटिझम या संशोधन संस्थेत पीएचडी केली आहे. त्यानंतर तिला पोस्ट डॉक्टरेट पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून नासामध्ये शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत राहणार आहे. तृणालीचे वडील अनिल शाह यांना आपल्या मुलीने इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे करावे म्हणून अवकाश संशोधन हा विषय निवडून तिला मोबाईलवर असंख्य व्हिडिओ आणि निरीक्षणं अभ्यास करण्यासाठी देत असत. त्यामुळेच तिला लहानपणापासूनच अंतराळ संशोधनाची आवड निर्माण झाली होती. त्यासाठी वडील अनिल, काका दिनेश, भाऊ राज आणि सर्वच शाह परिवाराने भरपूर प्रोत्साहन दिले. यामुळे तृणालीचे खऱ्या अर्थाने स्वप्न साकार झाल्याने तिला आकाश ठेंगणे झाले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नंबर ७३/१, ३/२, ७३/३, ७३/४, ७३/५अ या मिळकतींवर बांधलेल्या ''वैद्य संकुल'' या नावाच्या इमारतीमधील तळ मजल्यावरील, दुकान गाळा क्रमांक ०५, ज्याचे क्षेत्र ४२२ चौरस फुट चटई अशा वर्णनाचा दुकान गाळा मिळकत, त्या मिळकतीचे **मालक सुनिलकुमार रामस्वरुप सोनी व किशनकुमार काळुराम कुमार** यांचे कडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर दुकान गाळा मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील दुकान गाळा मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/११/२०२४

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी. दिनकर-निमकर
अपार्टमेन्ट बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

## दिवाळी अंकांचे शानदार प्रकाशन



**पनवेल :** के. गो. लिमये वाचनालयात २०२४च्या दिवाळी अंकांचे ॲड. सौ.माधुरी थळकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी, कार्यवाह जयश्री शेटे कार्यकारी सदस्य काशिनाथ जाधव, हिमालिनी कुलकर्णी, रोहिदास पोटे, संस्थेचे वाचक सभासद सुभाष कुडके,गोविंद चंदने, राजकुमार ताकमोगे तसेच अनेक वाचकांच्या उपस्थितीत दिवाळी अंकाचे शानदार प्रकाशन झाले.

संस्थेच्या आजीवसभासदांना १००/- रुपयात व इतर वाचकांना ३००/- रुपयात दिवाळी अंक वाचण्यासाठी मिळतील. ४०० च्यावर दर्जेदार दिवाळी अंकाचा खजिना वाचकांसाठी उपलब्ध असणार आहे. प्रकाशनाच्या प्रसंगी अनेक वाचकांनी दिवाळी अंकांचे सभासदत्व स्वीकारले. सकाळी ८.३० ते रात्रौ ८.०० या वेळेत सभासदत्व स्वीकारले जाईल. असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांनी केले. तरी जास्तीत जास्त सभासदांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## एक पणती त्यागाची, स्वत:च्या आनंदासाठी

**पनवेल :** संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे पनवेल जवळच असलेल्या बापदेववाडी येथील आदिवासी पाड्यात तसेच रुशिवन वृध्दाश्रम नवीन पनवेल येथील सत्तरीच्या पुढे रहात असलेल्या आजी-आजोबा आणि आश्रमातील इतर कार्यकर्ते यांच्या सोबत दिवाळी साजरी करण्यात आली. वृद्धाश्रमात आजी-आजोबांसाठी फराळ तसेच जेवण देण्यात आले. यावेळी मधुरा गवाणकर, मानस कुलकर्णी या दोघांचा वाढदिवस आजी - आजोबांसोबत केक कापून साजरा करण्यात आला.

Format C-1
(for candidate to publish in Newspapers, TV)

**Declaration about criminal case**
(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate : SUDHAKAR PARSHURAM GHARE
AT SANGAVI, POST KONDIWADE, TALUKA KARJAT,
DISTRICT RAIAD-410201.
Name of political party : INDEPENDENT
(Independent candidates should write "Independent" here)
Name of Election : Maharashtra Legislative Assembly, 2024
*Name of Constituency : 189-KARJAT

I, SUDHAKAR PARSHURAM GHARE (name of candidate), a candidate for the above-mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending criminal cases

| SL No. | Name of Court | Case No. and dated | Status of Case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Learned J. M. F. C., Karjat, Raigad, 410201 | RCC/161/2023 Dated 18-09-2023 | Pending /Ongoing | Section 324, 143, 147, 148, 149, 504 & 506 of the Indian Penal Code, 1860, Causing hurt, Rioting, Intentional insult to provoke breach of peace |
| 2 | Police Station, Juhu, Mumbai | N A | Charges not yet framed | Section 406, 409, 420, 465, 467, 468, 471, 506 of the Indian Penal Code, 1860 Criminal breach of trust, Cheating, Forgery, Criminal Intimidation |
| 3 | Learned J. M. F. C., Karjat, Raigad, 410201 | RCC/1/2018 Dated 02-01-2018 | Pending /Ongoing | Section 34, 417, 418 of the Indian Penal Code, 1860, Cheating, Acts done in furtherance of common intention |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sl. No. | Name of Court & date(s) of Order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| | NOT APPLICABLE | | |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

### General Legislative Assembly Election 2024
### District-Raigad
### Corrigendum

The Hon'ble Election Commission of India of Raigad Assembly Constitunecy For the general election, Election observer (General) Like this Below are the appointed officer.

| Sr. No. | Election Observer | Name & Contact No. of AC's | Election Observer Name | Mobile No. | Venue & available to attend the public grievances | Timing |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | General | 192-Alibag | Roohi khan (IAS-2013) G-30722 | 7666322356 | Camp Office, Fountain Head chondhi, Alibag | 9.00 AM To 9.30 AM |

Sign/-
(Kishan N. Jawale)
District Election Officer &
Collector Raigad-Alibag

**सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४**
**जिल्हा रायगड**
**शुद्धीपत्रक**

मा. भारत निवडणूक आयोगाने रायगड विधानसभा मतदार संघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी खालीलप्रमाणे निवडणूक निरीक्षक (सामान्य) नियुक्त केलेले आहेत.

| अ. क्र. | निवडणूक निरीक्षक | मतदार संघाचे नाव व संपर्क क्रमांक | निवडणूक निरीक्षकांचे नाव | मोबाईल क्रमांक | सार्वजनिक तक्रारींना उपस्थित राहण्यासाठी ठिकाण आणि उपलब्ध वेळ | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य | १९२-अलिबाग | रूही खान (आइएस-२०१३) जी-३०७२२ | ७६६६३२२३५६ | छावणी कार्यालय, फाऊंटन हेड, चोंढी अलिबाग | सकाळी ९.०० ते ९.३० पर्यंत |

सही/-
**(किशन जावळे)**
जिल्हा निवडणूक अधिकारी तथा
जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग

### ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड
### जाहीर नोटीस

दि. ०४/११/२०२४
जा.क्र. /२०२२

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधासह व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे नावाने मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ४ | ९०४/१,२ | शिवनगर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ३० X २६= ७८० चौ. फूट | श्रीरंग येदा पाटील | श्री. निलेश श्रीरंग पाटील श्री. उमेश श्रीरंग पाटील |
| २ | २ | १३४ | शिवाजीनगर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम तळमजला + पहिला मजला चौ. फूट | अशोक सखाराम महाडिक | हर्षल अशोक महाडिक |
| ३ | ६ | १०१२/८ | प्रभातदर्पण सोसा. रस्ता | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम सदनिका ५९९ चौ. फूट | यशवंत द. मोकल | निलेश श्रीधर मोकल |
| ४ | ५ | ९९५/३ | रसिका सह. गृह संस्था, सुजलाम नगर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम सदनिका ५०२ चौ. फूट | उदय नारायण भगत | शिवकुमार गणेश साने अश्विनी शिवकुमार साने |
| ५ | १ | ११२१ | भास्कर सह. गृह संस्था | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम दुकानगाळा २७५ चौ. फूट | नंदिनी दिलीप देवरूखकर | हर्षदा स्वागत मोकल स्वागत विजय मोकल |
| ६ | ६ | १८७९ | चेंढरे बायपास रस्ता | लोखंडी अँगल पत्रा शेड ३०० चौ. फूट | राजू मलेश लिंगाण्णा | राजामाली राजू लिंगाण्णा |
| ७ | ४ | ९७१/४ | सई गृह. संस्था | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५३५ चौ. फूट | मंगला सुधांशू श्रीधनकर सुधांशू रामराव श्रीधनकर | मंगला सुधांशू श्रीधनकर |
| ८ | २ | ८५८/१ | विद्यानगर पश्चिम | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम चौ. फूट | चिदानंद आबण्णा हुक्केरो | निलावती चिदानंद हुक्केरो |
| ९ | ५ | ५४४/१ | गायत्री सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ६३६ चौ. फूट | शामला विनायक म्हात्रे | प्रफुल्लता सचिन खैरनार |
| १० | २ | ८८३/६ | शिवालय बिल्डींग | आर.सी.सी. पहिला मजला ४५६ चौ. फूट | गिता फिलीप्स वर्गीस | सोनल जितेंद्र बेर्डे अभिषेक रविंद्र बेर्डे |

**श्री. निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता. अलिबाग, जि. रायगड**

**सौ. स्वाती सतिश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता. अलिबाग, जि. रायगड**

# जनता घराणेशाहीला कंटाळली आहे

## अनिल नवगणे यांची तटकरे कुटुंबियांवर टीका

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

**श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील जनता घराणेशाहीला कंटाळली आहे. त्यांना आता परिवर्तन पाहिजे आहे आणि आता जनतेला नवगणे रुपी पर्याय देखील मिळाला आहे. यावेळी मतदारसंघाचा आढावा घेताना एक लक्षात आले की या मतदारसंघातील सर्व समाज घटकांचा पाठिंबा महाविकास आघाडीला आहे, असे प्रतिपादन महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल नवगणे यांनी केल आहे.**

श्रीवर्धन येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाविकास आघाडीचे श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ उमेदवार कार्यालयाचे उद्घाटन अनिल नवगणे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते.



यावेळी नवगणे यांनी तटकरे कुटुंबीयावर सडकून टीका केली आहे. ते म्हणाले की, श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरील सुशोभीकरण व तालुक्यात झालेली अनेक समाजमंदिर ही विकासकामे नाहीत. सुशोभिकरणाचा फायदा किती स्थानिकांना झाला त्याचप्रमाणे समाजमंदिर उभारत तटकरे कुटुंब प्रत्येक समाजाला भावुक करत आहेत. आता भावनांचे दिवस संपले आहेत. आता जनतेला परिवर्तन पाहिजे आहे. यावेळी सर्व समाज बांधवांना व समाज प्रतिनिधींना भेटलो असता प्रत्येकाने आपल्या भावना व्यक्त करताना एकच सांगितले की, आम्हाला परिवर्तन पाहिजे आहे. आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा सामान्य कार्यकर्त्याविरूद्ध राष्ट्रवादी काँग्रेसची घराणेशाही, अशी खरी लढत होणार आहे. २३ नोव्हेंबरला श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात परिवर्तन झालेला जनतेला दिसेल. असे मत मविआचे उमेदवार अनिल नवगणे यांनी मांडले आहे.

यावेळी माजी आमदार तुकाराम सुर्वे, श्रीवर्धन तालुका प्रमुख अविनाश कोळंबेकर, माजी सभापती बाबुराव चोरगे, उपशहर प्रमुख अजिंकेश भाटकर, युवासेना शहर अधिकारी शिवराज चाफेकर, शेतकरी कामगार पक्षाचे श्रीवर्धन तालुका सरचिटणीस वसंत यादव, संघटक अरूण शिगवण तसेच महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीवर्धनमधील ११ उमेदवार रिंगणात

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

अगामी महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी श्रीवर्धन विधान सभा मतदार संघात ज्ञानदेव मारुती पवार (अपक्ष) यांनी आपले नामनिर्देशनपत्र काढून घेतल्यामुळे पुढील ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यात अनिल द. नवगणे (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार), आदिती सुनिल तटकरे (राष्ट्रवादी), अश्विनी उत्तम साळवी (बसपा), फैजल अब्दुल अजीज पोपेरे (मनसे), अनंत बा.गिते (अपक्ष), कृष्णा बा.कोबनाक (अपक्ष), मोहम्मद कासिम बु.सोलकर (अपक्ष), युवराज भुजबळ (अपक्ष), राजाभाऊ ठाकूर (अपक्ष), संतोष तानाजी पवार (अपक्ष), अशरफखान दादाखान पठाण (अपक्ष) हे उमेदवार आपले नशीब आजमावणार आहेत. जरी ११ उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी मुख्य लढत राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे व राष्ट्रवादी शरदचंद्र पवारचे उमेदवार अनिल नवगणे यांच्यातच होणार आहे.



# थोरवे यांचा प्रचार करणार नाही

## भाजपचे बंडखोर उमेदवार ठाकरे यांची भूमिका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदार संघात किरण ठाकरे यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर पत्रकार परिषद घेऊन आपण आणि आपले कार्यकर्ते महेंद्र थोरवे यांचे प्रचार करणार नसल्याचे जाहीर केले आहे.



कर्जत विधानसभा मतदारसंघातील भाजपचे बंडखोर उमेदवार किरण ठाकरे यांनी कर्जत रॉयल गार्डन येथे पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली आहे. यावेळी किरण ठाकरे यांनी नामांकन अर्ज मागे घेण्याबद्दल खुलासा करताना सांगितले की, आम्ही निवडणूक लढवण्याची तयारी केली होती. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तशी तयारी होती. पक्षाचे राष्ट्रीय नेते नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील सर्व बंडखोर यांची उमेद्वारी मागे घेण्याचे आदेश दिले होते. यामुळे आज मी अर्ज मागे घेतला असल्याचे किरण ठाकरे यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना ठाकरे म्हणाले की, शनिवारी (दि.३) झालेल्या बैठकीत आम्ही पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांचा कामकाजातून कार्यकर्त्यांचा संभ्रम होत असून कार्यकर्त्यांनी तशा तक्रारी केल्या आहेत. जिल्हा अध्यक्ष हे वेगळ्या प्रकारे काम करीत असून आम्ही आमच्या भावना या मंत्री महोदय यांच्याकडे केली आहे. मी स्वतः देखील रवींद्र चव्हाण यांच्याकडे जिल्हा अध्यक्ष यांच्याबाबत जिल्हा नेतृत्व बदलावे, अशी मागणी केली आहे.

तसेच, महायुतीला पाठिंबा देण्याचे पक्षाचे आदेश असून सर्व कार्यकर्ते हे महायुतीचा प्रचार करणार आहेत. मी महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांचा प्रचार करणार नाही. तर, महायुतीचे काम करणार आहे. आमच्या कार्यकर्त्यांना त्यांच्याकडून त्रास दिला जात आहे आणि त्यामुळे ते उद्या निवडून आले तरी ते कार्यकर्त्यांचा त्रास कमी होणार नाही. यामुळे आम्ही महेंद्र थोरवे यांना विरोध करणार आहोत.

# उणेगाव शाळेतर्फे मतदार जनजागृती



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये सर्व मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून निर्भयपणे मतदान करावे, यासाठी माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद उत्कृष्ट शाळा-उणेगावतर्फे मतदार जनजागृती अभियान फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

‘मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो... उठा उठा निवडणूक आली, मतदान करण्याची वेळ झाली... हम सब की एक पुकार, मतदान हमारा अधिकार... नाही विकला जाणार, निर्भय होवून मतदान करणार... अशा घोषणा देत संपूर्ण गावातून फेरी काढून जनजागृती करण्यात आली. सोबत मतदारांनी मतदान करणार असल्याबाबतचे संकल्प पत्र भरून दिले. गावातील मतदार बंधू आणि भगिनींनी सदर जनजागृती फेरीस उदंड प्रतिसाद दिला. येत्या निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढवून योग्य उमेदवार निवडून देवू असे आश्वासन दिले. या मतदार जनजागृती फेरीसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत गावडे, विषय शिक्षक सुर्यभान शिरसाट, उपशिक्षक मुकेश भोस्तेकर आणि अमोल हांगे यांनी उत्तम नियोजन केले होते.

# कर्जतमध्ये तीन उमेदवारांची माघार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदार संघात सोमवारी (दि.४) नामांकन अर्ज मागे घेण्याच्या निर्धारित मुदतीत १२ पैकी ३ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने ९ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. भाजपचे बंडखोर उमेदवार किरण ठाकरे यांनी माघार घेतली आहे. दरम्यान, कर्जत विधानसभा मतदारसंघात आता महायुतीचे महेंद्र सदाशिव थोरवे विरुद्ध महाविकास आघडीचे नितीन सावंत विरुद्ध अपक्ष सुधाकर परशुराम घारे अशी तिरंगी लढत होणार आहे.

## ■ १२ पैकी ९ उमेदवार रिंगणात

कर्जत मतदारसंघातील अंतिम उमेदवार महेंद्र सदाशिव थोरव (शिवसेना), नितीन नंदकुमार सावंत (शिवसेना ठाकरे पक्ष), श्रीराम बळीराम महाडिक (बसपा), जाविद अकदास खोत (अपक्ष), महेंद्र लक्ष्मण थोरवे (अपक्ष), विशाल विष्णू पाटील (अपक्ष), सुधाकर परशुराम घारे (अपक्ष), सुधाकर यादवराव घारे (अपक्ष), सुधाकर शंकर घारे (अपक्ष) हे आहेत.

# लढणार आणि जिंकणार- प्रीतम म्हात्रे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

उरणची जागा आम्ही लढणार आणि जिंकणार सुद्धा असा दावा शेकापचे उमेदवार प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी केला आहे. कार्यकर्ते ही शेकापची ताकद आहे. त्यांच्या निष्ठेने पक्ष वाढत असतो. आम्ही त्यांच्या इच्छेनुसार चालतो. या ठिकाणी स्थानिकांना कमी लेखण्याचे काम काही जण करत असतील तर त्यांना जागा दाखवून देण्यासाठी आम्हाला लढणे आवश्यक आहे. शेकाप हा नेहमी संघर्ष करून यश संपादन करत असतो. पक्षाला चळवळीचा वारसा आहे. एकनिष्ठेचा लाल बावटा हाती घेऊन कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे आम्ही ही निवडणूक लढवणार आहोत. स्थानिकांना रोजगार देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. याला प्रत्यक्षरूप येण्यासाठी ही निवडणूक लढणे आवश्यक आहे आणि ती जिंकणे सुद्धा अत्यावश्यक आहे, असे मत शेकापचे उमेदवार प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी व्यक्त करून राजकीय वावड्यांना पूर्ण विराम दिला आहे.



# माणगावात मतदान जनजागृती उपक्रम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा भुवन आदिवासीवाडी येथे स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम घेण्यात आला. यावेळी सकाळी विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली. या रॅलीत शंभर टक्के मतदान करण्यासंबंधी घोषणा देण्यात आल्या. पालक, तरुण मंडळाने या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. मतदान जनजागृती होण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या चित्रकला, रंगभरण स्पर्धा घेऊन विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. तसेच, पालकांकडून मतदान करण्यासंबंधीचे संकल्पपत्र भरुन घेऊन संदेश कार्डही देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश जगताप, उपाध्यक्षा सुनिता वाघमारे, सदस्या पारु जगताप, मुख्याध्यापक हेमंत बारटक्के, उपशिक्षक किशोर तायडे, अंगणवाडी सेविका नेहा शिर्के यांनी मेहनत घेतली.




# मतदानासाठी जनजागृतीपर रॅली

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मतदार जनजागृती उपक्रमांतर्गत माणगाव नगरपंचायत हद्दीतील राजिप शाळा भादाव शाळेच्यावतीने भादाव गावामध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता संतोष मालोरे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातमध्ये मतदार जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावामध्ये मतदान जनजागृती गीत-गायन करून रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी घोषवाक्य असलेले फलक घेऊन गावामध्ये जनजागृती केली. यावेळी शाळा व्यवस्थापन अध्यक्ष अनिता डवले, प्रकाश उभारे, अंगणवाडी ताई, उपशिक्षिका समिता महाडिक, सतीश तळकर, चंद्रकला गोसावी आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# उरण मतदारसंघात तिरंगी लढत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण विधानसभा मतदार संघातील एकूण १६ उमेदवारांपैकी संतोष हिराजी ठाकूर व जितेंद्र दामोदर म्हात्रे या २ अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली आहे. आता १६ पैकी १४ उमेदवार निवडणुकीच्या लढतीत राहिले आहेत. यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रितम जनार्दन म्हात्रे, शिवसेना (ठाकरे गट) उमेदवार मनोहर गजानन भोईर व भारतीय जनता पार्टीचे (अपक्ष) विद्यमान आ. महेश बालदी यांच्यात तिरंगी लढत होणार असून, मनसेचे सत्यवान पंढरीनाथ भगत, बहुजन पार्टीचे सुनिल मारुती गायकवाड, लोकराज्य पार्टीचे महेश गणपत कोळी, अपक्ष श्रीकन्या तेजस डाकी, अपक्ष कुंदन प्रभाकर घरत, अपक्ष निलम मधुकर कडू, अपक्ष बाळकृष्ण धनाजी घरत, अपक्ष कृष्णा पांडुरंग वाघमारे, अपक्ष मनोहर परशुराम भोईर, अपक्ष प्रीतम धनाजी म्हात्रे व अपक्ष प्रीतम बळीराम म्हात्रे हे ११ उमेदवार आपले नशीब आजमावणार आहेत.

## म्हात्रे कुटुंबियांची पत्रकारांसोबत दिवाळी

**। उरण । प्रतिनिधी ।**

जे.एम. म्हात्रे यांच्या कोपर गाव येथील निवासस्थानी शनिवारी (दि.२) पत्रकारांसाठी दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकापचे रायगड जिल्हा खजिनदार प्रीतम म्हात्रे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सर्व प्रकारच्या घडामोडी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी निःस्वार्थीपणे काम करणारा पत्रकार हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. पत्रकारांनी समजहितासाठी काम करून समाजात आदर्श निर्माण केला आहे. यामुळे पत्रकारांप्रति आदर व एक कुटुंब म्हणून म्हात्रे कुटुंबातर्फे दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले आहे.

# पेणमधील सराईत चोर जेरबंद



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील काश्मीरे वाडी येथील नुतन बाळकृष्ण पाटील यांच्या राहत्या घरात चोरी झाल्याची घटना घडली होती. सराईत चोराने दिवसाढवळ्या कुलुप तोडून घरात प्रवेश करुन लोखंडी कपाटतील अंदाजे ६३ हजार किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले होते. सीसीटीव्ही फुटेजच तांत्रिक विश्लेषण करुन हा गुन्हा उघडकीस आणला आहे. या गुन्ह्यातील आरोपी गिरवले येथील रहिवाशी रिक्षाचालक अनिल लक्ष्मण नाईक (४१) यांना अटक करण्यात आली आहे. अनिल नाईक यांनी तपासादरम्यान गुन्हा केल्याची कबुली दिली असून त्यांच्या ताब्यातून चोरी केलेले सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल असा एकूण १ लाख ३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या आदेशाने या गुन्ह्याचा तपास पोह. अजिंक्य अनंत म्हात्रे यांच्याकडे देण्यात आलेला असून, या गुन्ह्याचा तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदीप बागुल पेण पोलीस ठाणे यांच्या सुचनानुसार गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार हे करीत होते.

## लोकप्रतिनिधींची उदासीनता सर्वस्वी जबाबदार

# खारेपाटात पाणीप्रश्न कळीचा मुद्दा




**। पेण । प्रतिनिधी ।**

गेल्या चार निवडणूका पेण खारेपाटातील पाण्याच्या प्रश्नावर लढल्या गेल्या आहेत. २०२४ ची निवडणूक सुद्धा याच मुद्यावर गाजणार यात काही शंका नाही. नवी मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या हेटवणा धरण हाकेच्या अंतरावर असून देखील खारेपाटात जानेवारी नंतर पाणी टंचाईला सुरूवात होते. या विभागात शेकापक्षा मार्फत वेगवेगळ्या दोन योजना राबविल्या आहेत. या दोन्ही योजना यशस्वी झाल्यात, परंतु पुर्णतः पाणी प्रश्न सोडविण्यास यश आले नाही.

आजच्या घडीला या विभागात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भाजप कागदावर असलेल्या योजनेचा श्रेय घेऊ पाहत आहेत. परंतु, कागदावर असलेली योजना अंमलात येण्यासाठी पुढची विधानसभेची निवडणूक येणार नाही, अशी खात्री विद्यमान खासदार तटकरे किंवा आमदार रवि पाटील हे दोघेही देत नाहीत. खारेपाटात योग्यप्रकारे पाणी पुरवठा होत नसल्याने अनेक वेळेला खारेपाट साथीच्या आजाराच्या विळख्यात सापडतो. याला सर्वस्वी जबाबदार लोकप्रतिनिधींची खारेपाटा प्रती असलेली उदासिनताच आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे खारेपाटातील मतदार हा सुज्ञ व उच्च शिक्षित आहे. पेण विधानसभा मतदार संघाचा विचार करता समाज माध्यमांवर सर्वात जास्त सक्रिय खारेपाट विभाग आहे. यामुळे राजकीय मंडळीला या विभागात मतदार डोईजड जातात. कारण या मतदारांना लक्ष्मी दर्शन भुरळ घालू शकत नाहीत. त्यांना विकासकामांची गरज आहे. आज खारेपाट विभागात पाणी समस्या असल्याने कित्येक जणांनी स्वतःला स्थलांतरीत करून परवडत नसताना देखील शहराच्या आजुबाजुला राहणे पसंत केले आहे. खारेपाटातील पाणी प्रश्न हा नियोजनाच्या आभावामुळे आणि लोकप्रतिनिधींच्या नाकरतेपणामुळे शिल्लक असल्याचे मत मतदारांचे आहे. यामुळे या निवडणूकीत देखील पाणी प्रश्न हा प्रस्तापितांना महागात पडण्याची शक्यता नाकरता येणार नाही.

# पेणमध्ये सप्तरंगी लढत



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण विधानसभा मतदार संघामध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी १५ पैकी ८ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून, ७ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. यामुळे पेण विधानसभा मतदार संघात सप्तरंगी लढत पहायला मिळणार आहे. यामध्ये शेकापकडून अतुल नंदकूमार म्हात्रे, भाजप रविंद्र दगडू पाटील, शिवसेना उबाठा गट प्रसाद खेळुराम भोईर, बहुजन समाज पार्टी अनुजा केशव साळवी, अभिनव भारत मंगल परशूराम पाटील, वंचित बहुजन आघाडी देवेंद्र मारुती कोळी, तर अपक्ष म्हणून विश्वास मधूकर बागुल हे उमेदवार आहेत. जरी सात उमेदवार असले तरी खरी लढत ही अतुल म्हात्रे, रविंद्र पाटील आणि प्रसाद भोईर यांच्यामध्ये पहायला मिळणार आहे.

# वाघावरून उतरताना

वाघावर स्वार होणे एक वेळ सोपे असते. पण त्याच्यावरून उतरणे कठीण असते. मनोज जरांगे यांच्या निमित्ताने याचा पुन्हा एकवार प्रत्यय आला. आता निवडणुकीत माघार घेऊन जरांगे अर्धवट वाघावरून उतरले आहेत आणि तरीही आंदोलनाचा वाघ आपल्या कह्यात राहील असा त्यांचा दावा आहे. ते खरे ठरते का हे येत्या काळात दिसेलच. पण तूर्तास तरी आंदोलनाच्या विश्वासार्हतेला धक्का बसला आहे यात शंका नाही. गेल्या दोन महिन्यांपासून जरांगे विधानसभा निवडणुकीत हंगामा करण्याची तयारी करीत होते. मध्यंतरी ते स्वतः निवडणूक लढणार अशीही चर्चा होती. नंतर ते आपले काही उमेदवार ठराविक ठिकाणी उतरवणार असे सांगू लागले. बाकीच्या ठिकाणी पाडापाडी करणार असे ठरले. उमेदवारी अर्ज भरण्याच्या मुदतीपर्यंत गोंधळाची स्थिती कायम राहिली. शेवटी अर्जमाघारीच्या दिवशी फैसला घेणे भाग पडले. जरांगेच्या आंदोलनाच्या वतीने अर्ज भरलेल्या सर्वांना माघार घेण्याचे आदेश द्यावे लागले. लोकांनी प्रत्येक मतदारसंघात त्यांना योग्य वाटेल त्याला मत द्यावे असे जरांगे म्हणाले. एकीकडे आम्हाला पाडापाडी करायची नाही असे म्हणतानाच, लोक योग्य त्या उमेदवारांना हळूच पाडतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. याचा वीस नोव्हेंबरपर्यंत कोणाला पाडाचचे व कोणाला चालवायचे याच्या छुप्या याद्या तयार होण्याची शक्यता आहे. आजच्या सोशल मिडियाच्या काळात अशा याद्या सगळीकडे विजेच्या वेगाने पसरतील. त्यांचा थोडाबहुत परिणाम दिसेलच. ते काहीही असले तरी जरांगे यांना उघडपणे निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर पडावे लागले ही वस्तुस्थिती आहे. मित्रपक्षाची यादी आली नाही असे कारण यासाठी जरांगेंनी दिले. मात्र काल-परवा सोबत आलेल्या मुस्लिम आणि दलित गटांना जरांगे मित्रपक्ष म्हणत असतील तर त्यांच्यावर त्यांनी इतका भरवसा कसा टाकला हेच आश्चर्याचे आहे. मधल्या काळात त्यांची भेट घेण्यासाठी सर्वपक्षीय आणि सर्वजातीय आमदारांची रीघ लागली होती. त्यात अनेक मंत्री वगैरेही होते.

### सगळेच मराठा

मराठा आंदोलनाच्या मागण्या मान्य आहेत असे लिहून देतील त्यांना आपण पाठिंबा देऊ असे जरांगे सांगत होते. भेट घेतलेल्यापैकी वा इतर किती व कोणत्या नेत्यांनी असे लिहून दिले हे जाहीर करायला हरकत नव्हती. ते झालेले नाही. याची कारणे दोन दिसतात. एक म्हणजे जरांगे यांची मागणी सरसकटपणे मान्य करणे कोणत्याही पक्षाला शक्य नाही. विशेषतः निवडणुकीच्या तोंडावर तर ते खासच गैरसोयीचे आहे. मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण द्या या मागणीवर जरांगे अडून आहेत. शिवाय, सगेसोयऱ्यांनाही आरक्षण मिळावे असे त्यांचे म्हणणे आहे. यामुळे आपले आरक्षण कमी होईल अशी भीती ओबीसी जाती तसेच कुणबी इत्यादींना वाटते. त्यातूनच आज ओबीसींचे आंदोलन उभे राहिले व त्यांनीही उपोषणे वगैरे केली. या समाजांना दुखावणे कोणालाच शक्य नाही. हे आरक्षण न्यायालयात टिकेल का याबाबत संदेह आहे. त्यामुळे हा प्रश्न म्हणजे आता जळता निखारा झाला आहे. मंत्री, आमदार इत्यादी जरांगे यांना भेटत असले तरी त्यांना पक्षाच्या भूमिकेच्या पलिकडे जाऊन लेखी वचन वगैरे देणे शक्य नव्हते. वैयक्तिकही ते अडचणीचे होते. दुसरे म्हणजे जरांगे यांनी हा वाद मराठे विरुध्द राज्यकर्ते किंवा मराठे विरुध्द इतर सर्व असा उभा करायचा प्रयत्न केला. पण, राज्यकर्त्या पक्षामध्ये मुख्यमंत्र्यांसह अनेक जण मराठाच आहेत. याच मुख्यमंत्र्यांची जरांगेंनी वेळोवेळी तारीफ केली आहे व अजूनही ते टीका करणे टाळतात. अनेक मतदारसंघांमध्ये लढतीत सर्व मुख्य पक्षांचे उमेदवार हे मराठाच असतील हे उघड आहे. त्या ठिकाणी एकाला पाठिंबा देणे म्हणज इतरांना पाडणे असा त्याचा अर्थ होता. खुद्द आंदोलनातर्फेही निवडणूक लढवायला एकाच ठिकाणी अनेक जण इच्छुक होते. यातल्या एकाला निवडून बाकीच्यांना बसायला सांगणे हेही सोपे नव्हते.

### प्रभाव राहीलच

या संभाव्य अडचणींचा विचार करून जरांगे यांनी मुळातच निवडणुकीच्या राजकारणात पडायला नको होते. पण लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झाले की भल्याभल्यांचा संयम सुटतो. नेते वाहवत जातात. गेल्या वर्षी एकदा मुंबईत सगेसोयरे यांची मागणी मान्य झाली असा दावा करून जरांगे यांनी उपोषण सोडले व नंतर विजयोत्सवही साजरे केले. त्यानंतर पुन्हा काहीच दिवसात सरकारने विश्वासघात केला असे म्हणून त्यांनी आंदोलनाचे अस्त्र उपसले तेव्हाच वास्तविक त्यांच्या निर्णयशक्तीबाबत शंका निर्माण झाली होती. तरीही जनता त्यांच्यामागे कायम राहिली. त्यानेच बहुदा जरांगे हवेत गेले. आपल्या मूळ मागणीच्या पलिकडे जाऊन मुस्लिम व दलित इत्यादी नेत्यांना सोबत घेऊन दबावगट बनवण्याची स्वप्ने पाहू लागले. पण निवडणुकीच्या राजकारणासाठी भक्कम संघटन आणि व्यापक कार्यक्रम लागतो. महाराष्ट्रासारख्या इतक्या मोठ्या राज्यात एका जातीच्या आरक्षणाच्या प्रश्नावर सर्व निवडणूक लढवता येऊ शकत नाही. खुद्द जरांगे यांनीही सोमवारी याची प्रामाणिक कबुली दिली. यापूर्वी त्यांची भाषा वेगळी होती. किमान ६९ मतदारसंघ असे आहेत की जिथे मराठा मतदारच आमदार कोण हे ठरवतील असे ते दोन दिवसांपूर्वीपर्यंत सांगत होते. असो. आपले दहापैकी पाच उमेदवार पडले तरीही आंदोलनाची नाचक्की होणार आणि सरकारला आज आंदोलनाची जी भीती वाटते ती संपणार हे त्यांच्या वेळीच लक्षात आले हे बरे झाले. अर्थात, यामुळे जरांगे यांचा येत्या निवडणुकीतला प्रभाव संपला आहे असे अजिबात नव्हे. आतापर्यंत तो केवळ महाविकास आघाडीला पूरक ठरेल असे वाटत होते तसे कदाचित होणार नाही. मात्र जरांगे सतत देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करीत आहेत. ते पाहता बहुतांश मतदान भाजप आणि महायुतीच्या विरोधात जाईल असे मानायला जागा आहे. जरांगेही पुढच्या काही दिवसात अप्रत्यक्षपणे काहीतरी सूचित करतीलच. जरांगेंच्या अचानक भूमिका बदलण्यामुळे मराठा मतदान एकगठ्ठा होण्याची शक्यता कमी झाली असली तरीही मराठवाड्यातल्या निकालांवर त्यांचा परिणाम होणार आहेच.

## विचार

# अध्यक्षपद कोण जिंकणार ?

**अमेरिकेमध्ये रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅट पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्यातील निवडणूक समीकरणे इतकी गुंतागुंतीची बनली आहेत की मोठे राजकीय पंडितही कोणतेही भाकीत करणे टाळत आहेत. ताज्या ओपिनियन पोलमध्येही निकराची स्पर्धा दिसून येत आहे. दोन्ही बाजू आपापल्या परीने निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत. संपूर्ण जगाचे लक्ष वेधणाऱ्या या निवडणुकीमध्ये कोण बाजी मारणार?**





**शिवाजी कराळे**

अमेरिकेच्या इतिहासातील अध्यक्षपदाची सर्वात कटू निवडणूक अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. निवडणूक प्रक्रियेच्या मध्यावर एखाद्या माजी अध्यक्षाला प्रतिस्पर्धी पक्षाच्या बदललेल्या उमेदवाराचा सामना करावा लागण्याची ही कदाचित पहिलीच वेळ आहे. रिपब्लिकन पक्षाचे स्पर्धक डोनाल्ड ट्रम्प आणि विद्यमान उपाध्यक्ष आणि डेमोक्रॅट पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्यातील निवडणूक समीकरणे इतकी गुंतागुंतीची बनली आहेत की मोठे राजकीय पंडितही कोणतेही भाकीत करणे टाळत आहेत. ताज्या ओपिनियन पोलमध्येही निकराची स्पर्धा दिसून येत आहे. दोन्ही बाजू आपापल्या परीने निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत. संपूर्ण जगाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे. सध्या जग ज्या प्रकारच्या अस्थिरतेतून जात आहे, ते पाहता या निवडणुकीचे महत्त्व वाढले आहे. अमेरिकेच्या या निवडणूक निकालाचा जागतिक रचनेवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होणार आहे. या वेळची अध्यक्षपदाची निवडणूक अनेक अर्थांनी मागील निवडणुकीपेक्षा वेगळी वाटते. याचे एक प्रमुख कारण म्हणजे या दोन्ही उमेदवारांपैकी कोणीही निवडणूक प्रचारात महत्वाची, ठसणारी मध्यवर्ती कल्पना मांडू शकलेले नाही. साधारणपणे कोणत्याही निवडणुकीत एखाद्या विशिष्ट मुद्द्याचा मतदारांवर सर्वाधिक प्रभाव पडतो; मात्र या वेळी अमेरिकन निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर ध्रुवीकरण होताना दिसत आहे. गेल्या काही काळापासून अमेरिकन समाजाचे ध्रुवीकरण होत असले तरी या निवडणुकीत सामाजिक, राजकीय आणि लैंगिक ध्रुवीकरणाचे प्रमाण अनपेक्षित आहे. दोन्ही उमेदवारांच्या भाषा आणि देहबोलीवरही याचा परिणाम होत असून, यामध्ये धोरणात्मक मुद्द्यांपेक्षा वैयक्तिक हल्ले अधिक होत आहेत.

या निवडणुकीत कोणताही मध्यवर्ती मुद्दा नसल्याने दोन्ही गट आपापल्या मूळ मुद्द्यांच्या मदतीने मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहेत. या माध्यमातून आपल्या मूळ मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित आणि एकत्रित करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. असे असले तरी या निवडणुकीत मुख्य मुद्दा स्थलांतरितांशी संबंधित आहे. स्थलांतरितांना अमेरिकन सुरक्षेसाठी आणि स्थानिक लोकांच्या रोजगारासाठी धोका असल्याचे सांगून त्यांच्याशी निगडीत धोरण बनवण्याबाबत दोन्ही गट बोलत आहेत. अध्यक्ष झाल्यानंतर अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठी स्थलांतराविरोधी मोहीम सुरू केली जाईल, असे ते सांगतात. त्याचप्रमाणे आर्थिक अनिश्चिततेशी झुंजत असलेल्या अमेरिकेचा कमकुवतपणा आपल्या निवडणूक प्रचाराच्या ताकदीत रूपांतरित करण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न आहे. बायडेन-हॅरिस प्रशासनाच्या आर्थिक अपयशावर प्रकाश टाकून तो चांगल्या आर्थिक परिस्थितीचे चित्र दाखवत आहे. ही आश्वासने अमेरिकन मतदारांना किती आकर्षक वाटतात, हे लवकरच कळेल. दुसरीकडे, हॅरिस या ट्रम्प यांचे कमकुवत दावे मांडत आहेत. ट्रम्प आपल्या दृढनिश्चयाचा आणि ताकदीचा दावा करत आहेत. ते हॅरिस त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन अनिश्चित आणि अस्थिर असे करत आहेत. मात्र ट्रम्प यांचे हे मनोगत धोरणातील सातत्य आणि स्थिरतेसाठी घातक आहे.

ट्रम्प यांनी काही अनपेक्षित निर्णय घेतले. त्यांचा हवाला देत हॅरिस आपली भाषणे करत असून या विषयावरील चर्चेची तयारी करत आहेत. याशिवाय हॅरिस कृष्णवर्णीय समाज आणि महिलांना आकर्षित करण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. गर्भपाताच्या मुद्द्यावर महिला अत्यंत संवेदनशील आहेत, तर ट्रम्प यांचा दृष्टिकोन या आघाडीवर सातत्याने बदलत आहे. त्यांच्या राजवटीत गर्भपात कायद्याबाबत शंका वाढत आहेत आणि डेमोक्रॅट पक्ष त्याचे भांडवल करत आहे. अलीकडे मिशेल ओबामा यांनीही हॅरिस यांच्या समर्थनार्थ या विषयावर चर्चा केली. स्थलांतरितांच्या मुद्द्यावर डेमोक्रॅटची भूमिका ट्रम्प यांच्यापेक्षा नरम आहे. त्यामुळेच दोन्ही पक्ष केवळ आपल्या मूळ मतदारांना आकर्षित करण्यावर भर देत आहेत, कारण त्यांनाही ध्रुवीकरणामुळे मतदार विभागताना दिसत आहेत. अमेरिकेतील लोकशाही संस्थांसाठीही ही निवडणूक प्रतिष्ठेचा प्रश्न बनली आहे. प्रतिकूल निवडणूक निकाल आल्यास ट्रम्प हा जनादेश नाकारू शकतात, यावर विश्वास ठेवणाऱ्यांची संख्या कमी नाही. यापूर्वीही त्यांनी असे केले आहे आणि अमेरिकन संसद-कॅपिटल हिलवर त्यांच्या समर्थकांनी केलेल्या दंगलीच्या आठवणी अजूनही लोकांच्या मनात आहेत. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास अमेरिकेच्या लोकशाही रचनेपुढे प्रश्नचिन्ह उपस्थित होतील.

ट्रम्प समर्थकांच्या अशा कोणत्याही प्रतिक्रियांचे दूरगामी परिणाम होतील. लोकशाही संस्थांच्या गुणवत्तेवर संपूर्ण जगाला उपदेश करणाऱ्या अमेरिकेसाठी अस्वस्थ परिस्थिती निर्माण होईल. ट्रम्प यांच्या विजयाच्या बाबतीत जागतिक समीकरणांवर मोठा परिणाम होईल. त्याने इमिग्रेशनबाबत कोणताही कठोर निर्णय घेतल्यास सर्व देशांवर परिणाम होईल, कारण काही स्थलांतरितांना त्यांच्या देशात पाठवले तर तणाव वाढेल. अमेरिकेसोबतच्या काही देशांच्या संबंधांवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अंतर्गत पातळीवरही संघर्ष वाढू शकतो. याशिवाय युक्रेनपासून इस्त्रायलपर्यंतच्या मुद्द्यांवर ट्रम्प यांचा दृष्टिकोन धक्कादायक ठरू शकतो. सर्वसाधारणपणे परराष्ट्र धोरणात सातत्य राखण्याचा दृष्टिकोन स्वीकारला जातो; परंतु ट्रम्प यांनी आपल्या शेवटच्या कार्यकाळात परराष्ट्र धोरणात आमूलाग्र बदल करून ही परंपरा मोडीत काढली आहे. नवीन टर्ममध्ये ते आणखी काही कठोर पावले उचलू शकतात. त्यामुळे आधीच अस्थिरतेशी झुंजत असलेल्या जागतिक संरचनेवर मोठा परिणाम होऊ शकतो.

वॉशिंग्टनमधील व्हाईट हाऊसमध्ये कमला हॅरीस सत्तेवर येणार की ट्रम्प कार्ड खेळणार, हे ५ नोव्हेंबरला होणारे मतदान ठरवेल. अमेरिकेत निवडणुकीच्या शर्यतीला अनेकदा काही राज्यांची लढाई म्हटले जाते. अनेक राज्यांचा रंग लाल (रिपब्लिकन) की निळा (डेमोक्रॅट) हे जवळपास निश्चित झाले आहे; परंतु काही राज्यांना जांभळी राज्ये म्हणतात. म्हणजेच या राज्यांमध्ये रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक पक्षांचे मतदार जवळजवळ समान आहेत.

स्विंग स्टेट जिंकणे हे उमेदवारासाठी आव्हान असते. कोणत्याही अध्यक्षपदाच्या उमेदवारासमोर सर्वात मोठे आव्हान असते, ते ही युद्धभूमी असलेली राज्ये किंवा स्विंग राज्ये जिंकणे. कारण ही अशी राज्ये आहेत, जिथे रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट पक्षांमध्ये जोरदार लढत आहे. प्रत्येक उमेदवार केवळ या राज्यांमधील प्रचाराकडे विशेष लक्ष देत आहे. या वेळी ॲरिझोना, जॉर्जिया, मिशिगन, पेनसिल्व्हेनिया, नॉर्थ कॅरोलिना या राज्यांमधील कल निर्णायक ठरेल, असे बोलले जात आहे. जॉर्जिया, पेनसिल्व्हेनिया आणि ॲरिझोना सारख्या स्विंग राज्यांमधील मतदारांनी मतदानात प्रचंड उत्साह दाखवला आहे. यामध्ये महिलांचीही संख्या मोठी आहे. ॲरिझोनामध्ये रिपब्लिकन पक्षाच्या मतदारांनी पोस्टल मतांचा मोठ्या प्रमाणात वापर केला आहे तर पेनसिल्व्हेनियामध्ये पोस्टल मते वापरणाऱ्यांमध्ये नोंदणीकृत डेमोक्रॅटिक पक्षाच्या मतदारांची संख्या जास्त आहे. स्विंग राज्यांमधील प्रारंभिक मतदान डेटा केवळ उमेदवारांची निवडणूक ताकद प्रकट करणार नाही, तर दोघांपैकी कोण अंतर कमी करू शकेल याचे संकेत देईल. अमेरिकेत मतदान संपताच मतमोजणी सुरू होते. परिणाम सहसा २४ तासांच्या आत स्पष्ट होतात; परंतु खडतर आणि किचकट प्रक्रियेमुळे ही प्रक्रिया कधी-कधी काही आठवड्यांपर्यंत लांबते. अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीसोबतच काँग्रेस आणि सिनेटच्याही निवडणुका घेतल्या जातात. भारत आणि अमेरिकेच्या निवडणुकांमधील सर्वात मोठा फरक शक्तिशाली कार्यालयांसाठी उमेदवारांच्या निवडीमध्ये दिसून येतो.

अमेरिकेत पक्ष अध्यक्षपदासाठी उमेदवार ठरवतो. तो जिंकला तर अध्यक्ष होतो. म्हणजेच अमेरिकेत अध्यक्षपदासाठी जनता आपल्या आवडत्या उमेदवाराला मत देते. अर्थात सर्वच जनता त्यासाठी मतदान करत नसते. अध्यक्षपदाचा उमेदवार सुरुवातीला निधी गोळा करतो आणि प्रचार करतो. लोकप्रियता आणि सार्वजनिक समर्थनाचे चित्र समोर आल्यानंतर रिपब्लिकन किंवा डेमोक्रॅटिक पक्ष त्याला पाठिंबा देतात. अमेरिकेत अध्यक्षपदाचा कार्यकाळ चार वर्षांचा असतो. अमेरिकेत गेल्या १८० वर्षांपासून नोव्हेंबरच्या पहिल्या मंगळवारी अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मतदान होते. अमेरिकेतील ५० राज्यांमधून ५३८ मतदार निवडले गेले आहेत. याला 'इलेक्टोरल कॉलेज' म्हणतात. मतदारांची ही संख्या राज्यानुसार बदलते आणि राज्यातील लोकसंख्येच्या गुणोत्तरानुसार निर्धारित केली जाते. नंतर, पक्षाच्या पसंतीच्या आधारावर निवडलेले मतदार अध्यक्षपदाच्या उमेदवाराला मत देतात. अमेरिकेचा निवडणूक इतिहास दर्शवतो की लोकप्रिय नेते निवडणुकीत पराभूत झाले आहेत आणि इलेक्टोरल कॉलेजचा जादुई क्रमांक मिळवून नेते व्हाईट हाऊसपर्यंतचा प्रवास सुनिश्चित करतात. अध्यक्ष होण्यासाठी कोणत्याही उमेदवाराला २७० किंवा त्याहून अधिक मते मिळणे आवश्यक असते. या वेळी ट्रम्प पुढे जातात की हॅरिस, हे लवकरच कळेल.

## आजकाल

# नोटबंदीच्या श्राद्धाला मोदी महाराष्ट्रात



**तुषार गायकवाड**

ज्या क्षणाची आपण सर्वजण आतुरतेने वाट पहात होतो, तो क्षण अवघ्या ५ दिवसांवर येवून ठेपलेला आहे. एनडीए सरकारचे शीर्षस्थ नेते, आपले पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी, महाराष्ट्राच्या सार्वत्रिक विधानसभांच्या निवडणूक प्रचारासाठी, नोटबंदीच्या वर्षश्राध्दाचा म्हणजेच '८ नोव्हेंबर' या दिवशी महाराष्ट्रात येत आहेत.

यावर्षी ८ नोव्हेंबरला नोटबंदीचे ८ वे पुण्यस्मरण व वर्षश्राध्द पार पडत आहे. नोटबंदीच्या निर्णयामुळे १५, ४४, ००० कोटी रुपयांच्या १,००० व ५०० रुपयांच्या दर्जेदार चलनी नोटा भारतीय चलनातून बाद केल्या. त्यापैकी १५, ३१, ००० कोटी रुपयांच्या १००० व ५०० रुपयांच्या दर्जेदार नोटा रिझर्व्ह बँके ऑफ इंडियाकडे जमा झाल्या.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नोटबंदीवरील अहवालानुसार, नोटाबंदीनंतर भारतीय चलनातून बाद झालेल्या ९९.३० टक्के नोटा बँकेकडे परत जमा झाल्या. म्हणजे केवळ ०.६० टक्के नोटा हा काळा पैसा होता. हा काळा पैसा शोधण्यासाठी नोटाबंदी करुन मोदींनी देशाच्या अर्थव्येवस्थेचे व गोरगरीबांचे अक्षरक्षः धिंडवडे काढले. हे म्हणजे घरात उंदीर झाले म्हणून उंदरांना नष्ट करण्यासाठी संपूर्ण घर जाळून खाक करुन टाकण्यासारखा प्रकार मोदींनी केला. निर्णय फसला तर भर चौकात फाशी द्या म्हणणाऱ्या मोदींनी, निर्णय फसल्यावर नोटबंदीच्या बाबतीत एकही चकार शब्द काढला नाही हे विशेष! मात्र रिझर्व्ह बँकेने नोटबंदी फसल्याचे मान्य केले. मोदींनी आणलेली दर्जाहीन २,००० रुपयांची चलनी नोट देखील मोदीनींच बंद केली. १९ मे २०२३ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने 'क्लीन नोट पॉलिसी' अंतर्गत २,००० रुपयांची नोट चलनातून मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्या दिवशी ३,५६,००,००० रुपयांच्या २,००० रुपयांच्या नोटा चलनात होत्या. ३१ जुलै २०२४ अखेर यातील ३,४८,००,००० रुपयांच्या नोटा बँकेत जमा झाल्या. रिझर्व्ह बँकेच्या याबाबतच्या अहवालानुसार, चलनात असलेल्या २,००० रुपयांच्या ९७.९२ टक्के नोटा परत आल्या. म्हणजेच मोदींनी आणलेल्या दर्जाहीन २,००० रुपयांच्या चलनी नोटापैंकी २.०८ टक्के नोटा काळा पैसा आहेत.

याचाच दुसरा स्पष्ट अर्थ, युपीए सरकारच्या १० वर्षांच्या कालखंडात भारतीय अर्थव्यवस्थेत फक्त ०.६० टक्के काळा पैसा होता. तर मोदींच्या कालखंडात अवघ्या ६-७ वर्षांत २.०८ टक्के काळा पैसा भारतीय अर्थव्यवस्थेत फोफावला. अर्थातच काळ्या पैशाला खतपाणी घालणारे पंतप्रधान, नोटबंदीच्या वर्षश्राध्दाच्या मुहुर्तावर राज्यात येत असलेने, मविआच्या नेते, कार्यकर्त्यांनी पंतप्रधानांचे स्वागत त्याच धर्तीवर करायला हवे. कारण ब्रॉंड मोदी म्हणणाऱ्या राज्यातील भाजपच्या नेत्यांनीच मोदींकडे आता पाठ फिरवली आहे.

लोकसभा निवडणूकीत मोदींनी राज्यात '१८ भव्य जाहीर सभा व १ रोड शो' केला होता. यापैकी भाजपाचे फक्त २ उमेदवार निवडून आले. एक म्हणजे नितीन गडकरी. त्यांचेसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कंबर कसली होती. तर दुसरे छत्रपती उदयनराजे भोसले. त्यांचेसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाची ताकद उभा केली होती. इतर सर्व ठिकाणी भाजपाचे मातब्बर नेते मोदींच्या सभा होवनूही पराभूत झाले.

त्यामुळे महाराष्ट्रात विधानसभेला कोणीही उमेदवार मोदींच्या सभा घेण्यासाठी इच्छुक नाहीत. यावेळी मोदी केवळ १० सभा मोदी घेणार असल्याचे समजतेय. ज्या उमेदवारांना मोदींची सभा हवी आहे, परमेश्वर त्यांना सुबुध्दी देवो. (साभार)

## लोकसंसद

### व्हाइट वॉशचे दुःख नाही... पण

भारतीय कसोटी क्रिकेटच्या ९२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच ३ सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघावर व्हाइट वॉशची नामुष्की ओढावली आणि भारतीय संघाला व्हाइट वॉश देणारा संघ कोणता, तर न्यूझीलंडचा, ज्या संघाला महिन्याभरापूर्वीच श्रीलंकन संघाने २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत व्हाइट वॉश दिला होता. बंगळुरू येथील कसोटी मालिकेतील पहिला सामना न्यूझीलंडने ८ गडी राखून जिंकल्यानंतर पुणे येथील दुसऱ्या कसोटीत तीन दिवसांतच भारतीय संघावर ११३ धावांनी मात करून मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली. अशा वेळी भारतीय क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या मुंबई कसोटीत विजयी होऊन भारतीय संघ पराभवाची तीव्रता कमी करील अशी अपेक्षा चाहत्यांना होती. मात्र येथेही तीन दिवसांतच भारतीय संघाने मान टाकली आणि २५ धावांनी पराभव पत्करत इतिहासात एका अप्रिय विक्रमाची नोंद केली. क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ मानला जातो आणि खेळामध्ये हार जीत ही व्हायचीच असे मानले तरी जागतिक क्रमवारीतील जगातील सर्वात बलाढ्य कसोटी संघ म्हणून गणला जाणारा भारतीय संघ कोणताही प्रतिकार न करता, न लढता खेळला आणि हरला याचे वाईट वाटते.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**५ नोव्हेंबर**

**१८८४ :** प्राच्यविद्या पंडित, संस्कृत साहित्य व वेदांचे गाढे अभ्यासक डॉ. हरी रामचंद्र दिवेकर यांचा जन्म. 'आमचा महाभारत पूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहास', 'हिंदी साहित्याचा सुरस व संक्षिप्त इतिहास', 'कौशिक सूत्र', 'वेदकालीन संस्कृतीचे दर्शन' इ. पुस्तके त्यांनी लिहिली. **१८८६ :** लेखक, कवी शंकर चिंतामण श्रीखंडे यांचा जन्म. पहिल्या महायुध्दाच्या काळात डॉक्टर म्हणून परदेशात असताना त्यांनी कुटुंबियांना पाठवलेली पत्रे कविता 'वाङ्मय श्रीखंड' या नावाने प्रसिध्द. **१८८९ :** कवी श्रीनिवास रामचंद्र बोबडे यांचा जन्म. 'बोबडे यांचा कवितासंग्रह' ह्या काव्यसंग्रहात त्यांच्या कविता प्रसिध्द. **१९०८:** साहित्यिक तुळशीरामपंत नागेशस्वामी काटकर नागेशस्वामी काटकर (उपाख्य) यांचा जन्म. 'नौप्वाली', 'वसंतश्री' हा खंडकाव्ये, शब्दसृष्टी, गोंडवनगीत, काही कविता हे काव्यसंग्रह. 'चिमुरचा स्वातंत्र्यसंग्राम' ह्या ऐतिहासिक ग्रंथासह चरित्र, संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९२० :** लेखक शंकर दिनकर इनामदार यांचा जन्म. लेखक मिलिटरीत इंजिनिअर. दुसऱ्या महायुध्दात निरक्षर सैनिकांना पत्र पाठवण्याची मदत करताना लेखनाची स्फूर्ती. यातून 'अव्यक्त', 'द्रौपदीची थाळी' या कादंबऱ्या आणि 'प्रतिभेट' हे कथासंग्रह अशी साहित्य निर्मिती झाली. **१९२२:** साहित्यिक, वेदांचे जाणकार हरिहर आठलेकर यांचा जन्म. त्यांच्या लेखनात मुलांसाठी 'छान छान गोष्टी', 'चू-चूची गोष्ट', 'हाबू वानराची गोष्ट' तसेच 'साखर माणसे' हा ललित लेखसंग्रह 'तथ-ास्तू' हा कथासंग्रह, 'बोगी नं. ४३९९' हे साहित्य संपदा. प्रवास वर्णन आणि 'वळणवाट', 'रानमोडी', 'वार्णाक्का' या कादंबऱ्या अशी **१९२९ :** कवी गीतकार योगेश्वर अभ्यंकर यांचा जन्म 'काल पाहिले मी स्वप्न गडे', 'विजयपताका श्रीरामाची', 'लाज राख नंदलाल' या सारखी लोकप्रिय गीत त्यांच्या नावावर आहेत. 'दुःख माझे रंगले' यातील त्यांच्या भावकविता रसिकांना भावल्या. 'एका दिलाची सिंहगर्जना' ही साहसगीते तर 'गीतकुणाल' हे कथा काव्य आणि रणी रंगली रणचंडी' ही स्फूर्ती गीते त्यांची प्रसिध्द 'आकाशगाणी' या संग्रहात त्यांची ५२५ गाणी समाविष्ट झाली आहे. भारतीय मनाच्या विविध भावनांचा आविष्कार त्यांच्या गीतातून आढळते. १४ नोव्हेंबर योगेश्वर अभ्यंकर यांचे निधन. **१९३२ :** मराठी व इंग्रजीतून कथाकथन करणारे लेखक प्रा. लक्ष्मण प्रभाकर दाते यांचा जन्म. 'अभिनय सम्राज्ञी' ह्या रहस्य कथेसह, 'कलावंताचे रहस्य', 'खुनी कुबेर', 'नारसिंहाचा शाप', 'मृताचा ठेवा' अशी रम्य कथा त्यांच्या नावावर आहेत. **१९३४ :** ख्रिस्ती धर्मविषयक लेखक प्रा. विश्वनाथ गोठोस्कर यांचा जन्म. 'अमरवचन' हा 'नवा करार' चा मराठी अनुवाद. तसेच 'देवदूत', 'नव्या कराराचा परिचय', 'मराठी बायबल', 'मार्ग हा सुखाचा', 'यातनांवर विजय' अशी साहित्य संपदा. **१९४४:** लेखिका शारदा साठे यांचा जन्म. प्रेरक ललकारी' या स्त्रीमुक्ती संघटनेच्या नियतकालिकेच्या संपादक असणाऱ्या साठे यांनी विविध विषयांवर लेखन केले आहे. **१९४५ :** दिग्दर्शक आणि चित्रपट विषयक लेखक अरुण खोपकर यांचा जन्म. 'गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका' या गाजलेल्या पुस्तकांसह विविध वर्तमानपत्रातून चित्रपट विषयक लिखाण प्रसिध्द. तसेच चित्रपटातून अभिनयही केला. **१९४७ :** अमराठी भाषिकांसाठी मराठी शिकण्यासाठी ''लर्निंग मराठी' हे पुस्तक लिहिणारे लेखक, समीक्षक, कादंबरीकार अंजली अरुण सोमण यांचा जन्म. 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', 'मराठी कथेची स्थितीगती' ह्या पुस्तकांसह ' विस्तारलेले क्षितिज' ह्या त्यांनी संपादित केलेल्या स्त्रियांच्या निवडक कथांचा संग्रह प्रसिध्द . **१९५१ :** लेखक जगदीश श्रीकृष्ण चाफेकर यांचा जन्म. ह्यांची 'सौभाग्यकांक्षिणी' ही कादंबरी ज्ञान आणि विज्ञान या संघर्षावर बेतलेली आहे. **१९५४ :** नाटककार सतीश जनार्दन भिडे यांचा जन्म. व्याभिचाराच्या विरोधात त्यांनी नाटक लिहिले असून काव्यलेखनाबरोबर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेली गाणी ते सादर करतात. 'संगीत हृदयनाथ' हे आणखी एक नाटक त्यांच्या नावावर आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**वसुधा विठ्ठल पाटील, वाढदिवस अलिबाग**


# आंबा हंगाम लांबणार

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

सतत होत असलेल्या वातावरणातील बदलांचा फटका आंबा हंगामाला बसणार आहे. गेल्या चार दिवसांत थंडी, ऊन आणि पाऊस असे वातावरण होते. हवेत हलका गारवा निर्माण झाला आणि धुकेही मोठ्या प्रमाणावर पडत आहे. त्यामुळे आंबा कलमांच्या मुळावर ताण येऊन आंबा मोहोर सुरू होईल, अशी शक्यता होती. परंतु, अचानक पावसाने दगा दिला आहे. त्यामुळे पालवी न फुटलेल्या झाडांनी पालवी येण्याची भीती बागायतदारांमध्ये आहे.

तसे झाले, तर फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस आंबा बाजारात येण्याची शक्यता लांबली आहे. यावर्षी सुरुवातीपासूनच पावसाचे प्रमाण जास्त होते. तसेच पाऊस ऑक्टोबरच्या मध्यांतरापर्यंत लांबला परतीच्या पावसाबरोबर अवकाळी पावसानेही किनारपट्टी भागाचा पिच्छा सोडला नाही. ऑक्टोबर महिन्यात दुसऱ्या पंधरवड्यातही पावसाचा मुक्काम होता. त्यामुळे ऑक्टोबर सरत आली, तरी अपेक्षित थंडीची प्रतीक्षा बागायतदारांमध्ये आहे.

ऑक्टोबर महिन्यात उन्हाळा कडाका सर्वाधिक होता. आता दिवाळीच्या दिवसात हवेत गारठा सुरु झाला आहे. पण, हवी तशी थंडी पडत नाही. त्याचे प्रमाण कमी आहे. दिवाळीत पडणाऱ्या थंडीतच कलमे मोहरु लागतात. वातावरण कोरडे असल्याने कलमे मोहरण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. ऐरवी थंडी पडायला सुरवात झाली की, ग्रामीण भागात आंबा कलमांना मोहर फुटू लागतो. यंदा अद्याप थंडी पडलेली नाही. त्याउलट, ऑक्टोबर हिटचा सामना करावा लागत आहे. वातावरण बदलल्यास कलमांना मोहर येईल; मात्र त्यासाठी यंदा नोव्हेंबर महिन्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे. येत्या काही दिवसांत थंडी वाढली, तर मोहर चांगला होऊन फेब्रुवारी मार्चमध्ये आंबा बाजारात येईल. मात्र, वातावरण प्रतिकूल राहिल्यास आंबा बाजारात दाखल होण्यास एप्रिल महिनाही उजाडेल, असा अंदाज बागायतदारांनी व्यक्त केला आहे.



- **अवकाळी पाऊस अन् गायब झालेल्या थंडीचा परिणाम**
- **बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण**

# कारागृहातील कैदी मतदानापासून वंचितच

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



निवडणूक ही लोकशाहीची महत्त्वपूर्ण प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. याद्वारे प्रतिनिधी निवडून दिला जातो. लोकशाहीत मतदानाला अनन्यसाधारणमहत्त्व आहे.एकीकडे शंभर टक्के मतदानासाठी प्रयत्न सुरू असतानाच या प्रक्रियेपासून जिल्हा विशेष कारागृहातील विविध कैदी वंचितच राहात आले आहेत. २०१४ ला रत्नागिरी जिल्हा विशेष कारागृहाने कैद्यांना मतदान करण्याचा अधिकार मिळावा किंवा एक मतदान केंद्र उभारावे, असा प्रस्ताव दिला होता; परंतु ते कैदी एका मतदारसंघातील नसल्यामुळे शासनाकडून तो फेटाळला गेला. सध्या या कारागृहातील राज्यातील २६० कैदी यंदाच्या मतदानापासून वंचित राहणार आहेत.

जाहिराती, फलक, पथनाट्य, सोशल मीडियाचा उपयोग करून लोकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले जाते. अतिशय पारदर्शक अशी ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी तेवढीच यंत्रणा राबते. पारदर्शक प्रक्रियेसाठी निवडणूक आयोगाचे या वर विशेष लक्ष असते. मतदानाच्या प्रक्रियेत कारागृहात शिक्षेसाठी आलेल्या कैद्यांना मतदानापासून वंचितच राहावे लागते. सध्या विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे.

रत्नागिरी विशेष कारागृहात २६० कच्चे- पक्के कैदी आहेत. त्यात १५ महिला कैद्यांचा समावेश आहे. त्या कैद्यांना या प्रक्रियेपासून अलिप्तच राहावे लागणार आहे. शासनाकडून कैद्यांची संख्या मागवली जाते; पण त्यावर पुढे काहीच होत नाही. येथील विशेष कारागृहाने २०१४ मध्ये कैद्यांसाठी एखादे मतदान केंद्र उभारून त्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, असा प्रस्ताव शासनाला पाठवण्यात आला होता; मात्र कारागृहातील कैदी हे वेगवेगळ्या मतदारसंघातून आलेले असतात. त्यांच्यासाठी वेगळे मतदान केंद्र राबविणे शक्य नाही, असे कारण दिले गेले. तो प्रस्ताव फेटाळला गेला. त्यामुळे निवडणूक कालावधीत कारागृहातील कैद्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी होत येत नाही.

# आ. किणीकरांच्या अडचणीत वाढ

**। अंबरनाथ । प्रतिनिधी ।**

अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात मनसेने उमेदवार उभा केला नसला तरी मनसेचे आमदार राजू पाटील यांनी ठाकरे गटाचे उमेदवार राजेश वानखेडे यांना मदत करण्याचे सूतोवाच केले आहे. तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी ठाकरे गटाच्या उमेदवाराला मदत करण्याचे संकेत दिले आहेत. या घडामोडींमुळे शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार आणि आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार डॉ. बालाजी किणीकर यांना कडवी लढत द्यावी लागणार असल्याची चिन्हे आहेत. सुरुवातीला शिवसेनेतून किणीकर यांना अंतर्गत विरोध होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः त्यात मध्यस्थी केल्याने दोन्ही गट एकत्र आले. किणीकर यांचा अर्ज दाखल करताना दोन्ही गटांनी आपली ताकद आणि एकता दाखवली. मात्र, दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये कमालीचे मतभेद आहेत. त्यामुळे हे मतभेद मिटून त्याचे रूपांतर मतांमध्ये होतील का, असा प्रश्न आहे. लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाला अंबरनाथ विधानसभेत चांगली मते मिळाली. कोणतीही संघटनात्मक बांधणी किंवा ताकद नसताना मिळालेली ही मते शिवसेना शिंदे गटासाठी धोक्याची घंटा होती.

# चौपदरीकरणात पावसाचा अडथळा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

- **मिऱ्या-कोल्हापूर महामार्गावर चिखलाचे साम्राज्य**
- **सलगच्या पावसामुळे वाहनचालकांचीही होतेय कसरत**

मिऱ्या-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. मात्र, त्यात अचानक पडणाऱ्या मुसळधार पावसाचा फटका बसत असून, वाहनचालकांची पंचाईत होत आहे. गेले दोन दिवस सायंकाळच्या सुमारास पावसाची हजेरी ठरलेली आहे. त्यामुळे खोदाई केलेल्या रस्त्यावर परिसरातील चिखल येऊन त्यामधून वाहन चालविण्याची कसरत करावी लागत आहे.

दिवसा कडकडीत उन्हामुळे रस्ते पुन्हा सुकल्यामुळे वाहतूक सुरळीत होत आहे. मिऱ्या-नागपूर राष्ट्रीय महामार्गाचे थांबलेल्या कामाला सध्या वेग आला आहे. रत्नागिरी शहराजवळील जे. के. फाईलपासून पुढे कुवारबावपर्यंतची कामे वेगाने सुरू आहेत. त्यासाठी काही ठिकाणी जुना रस्ता खोदून ठेवलेला आहे. तसेच रस्ता सपाटीकरणासाठी लाल माती टाकण्यात आलेली आहे. मागील आठवड्यात पावसाने विश्रांती घेतल्यामुळे चौपदरीकरणाच्या कामाला वेग आला होता. मात्र, सलग तीन दिवस जोरदार पाऊस सुरू झालेला आहे. सायंकाळच्या सत्रात पडणाऱ्या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी साचून राहते. रस्ता सपाटीकरणासाठी टाकलेली माती पाण्याबरोबर वाहून येत असल्यामुळे चिखल होत आहे. त्याचा सर्वाधिक त्रास सायंकाळी घरी परतणाऱ्या दुचाकी चालकांना बसत आहे.



# लांजा, संगमेश्वरला पावसाचा तडाखा

## कापणी केलेल्या पिकावर पाणी; शेतकरी चिंताग्रस्त

**रत्नागिरी, प्रतिनिधी**



सलग दोन दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसाने लांजा व संगमेश्वर तालुक्याला तडाखा बसला आहे. शुक्रवारी-शनिवारीही संगमेश्वरात धामणी, गोळवलीत वेगवान वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. लांजा तालुक्यातील भांबेड बाजारपेठेतील दोन घरांचे सुमारे १ लाख ८० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच संगमेश्वर खाडी पट्ट्यात अनेक ठिकाणी विजेचे खांब कोसळून वीजपुरवठा खंडित झालेला आहे. या पावसामुळे दिवसभर कापून ठेवलेले भात भिजून गेल्यामुळे नुकसान झाले आहे.

गेल्या चार-पाच दिवसांपासून पावसाने पूर्णपणे उघडीप घेतली होती. मात्र, बुधवारपासून सलग दोन दिवस सायंकाळच्या अचानकपणे वेगवान वाऱ्यासह जोरदार पाऊस पडत आहे. संपूर्ण तालुक्यात हा पाऊस कोसळला असला तरीही भांबेड, पेठदेव बाजारपेठेला वादळाचा तडाखा बसला. वेगवान वाऱ्यामुळे दोन घरांवरील असलेले सिमेंट पत्रे आणि छपरांची कौले उडून गेली. यामध्ये शैलजा जयराम गांधी यांच्या घराचे १ लाख ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच विलास परब यांच्या घराचे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेचा पंचनामा भांबेड मंडळ अधिकारी मराठे तसेच कोतवाल विजय दळवी यांनी केला. संगमेश्वर तालुक्यातील डिंगणी, प्रिंदवणे, फुणगुस, कोंडये परिसरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे परिसरात सर्वत्र पाणीच पाणी साचलेले होते. कापलेली भातशेती वाहून गेली आहेत. डिंगणीमधील काष्टेवाडी येथील पाईपलाईन तुटले असून, विजेचे खांबही पडलेले आहेत. रस्त्याशेजारील झाडे पडून डिंगणीकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे. जाधववाडी येथील माधव जाधव यांच्या घराच्या मंडपाचे छप्पर उडाले. डिंगणी आगरवाडी, खाडेवाडी येथे खांब पडले असून विद्युत प्रवाह खंडित झाला आहे.

# घरांच्या परवानग्या ऑनलाईन

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

सरकारने १ सप्टेंबरपासून घरांच्या परवानग्या पूर्णपणे ऑनलाईन स्वरुपात केल्या आहेत. आतापर्यंत रत्नागिरीत २० परवानगी प्रकरणे दाखल झाली असून, ती निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे घरांसाठी परवानगीला महसूल खाते आणि नगररचना विभागाकडील फेऱ्या कमी होणार आहेत.

नगररचना विभागाच्या अधिकृत सूत्रांनी सांगितले की, घराची परवानगी आता केवळ ऑनलाईन स्वरुपात मागावी लागेल. ऑफलाईन स्वरुपात म्हणजे प्रत्यक्ष दस्तऐवज हजर करुन परवानगीचे कामे होणार नाहीत. तसे दस्तऐवज आता स्वीकारले जात नाहीत. लोकांनी पूर्वीप्रमाणेच महसूल खात्यातील सक्षम प्राधिकाऱ्याकडे घर परवानगी मागितली पाहिजे. पण, ती ऑनलाईन स्वरुपात असावी. महसूल खात्याकडे सादर झालेले घर परवानगीचे अर्ज अभिप्रायांसाठी नगर रचना विभागाकडे वर्ग करण्यात आले आहेत. अशा अर्जांची संख्या आतापर्यंत २० वर जाऊन पोहोचली आहे. महसूल खात्यातील आणि नगर रचना विभागातील अधिकाऱ्यांना ऑनलाईन प्रकरणे हाताळणे ही बाब नवीन आहे. दर बुधवारी सकाळी १० ते १ या वेळेत नगररचना विभागाचे नागरिकांच्या ऑनलाईन प्रक्रियेवरील समस्या सोडवण्यासाठी आभासी मार्गदर्शन केंद्र चालवले आहे.

# ठाण्यात दिवाळीतील प्रदूषणात वाढ

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी दिवाळीनिमित्ताने फटाक्यांची आतषबाजी करण्यात येत असल्यामुळे हवा गुणवत्ता निर्देशांक १९० वर पोहोचला आहे तर, आवाजाची पातळी ८४ डेसिबल एवढी सर्वाधिक मोजण्यात आली आहे. यामुळे ठाण्यातील हवा आणि ध्वनी प्रदूषणात वाढ झाल्याची बाब पुढे आली आहे. दरम्यान, गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत हवा आणि ध्वनी प्रदूषण कमी झाल्याचा तसेच हरित फटाके फोडण्याचे प्रमाण वाढल्याने धुलीकणांचे प्रमाण घटल्याचा दावा पालिकेने केला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात दरवर्षी दिवाळी काळात हवा आणि ध्वनी प्रदूषणात वाढ होते. यंदाच्या दिवाळीतही हे चित्र कायम आहे. या काळात फटाके वाजण्याच्या प्रमाणातदेखील वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. शहरात दिवाळीपूर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक १२७ इतका होता. दिवाळी काळात मात्र त्यामध्ये वाढ झाली असून, शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक १९० एवढा नोंदवण्यात आला आहे. या काळात, आवाजाची पातळी ८४ डेसिबल एवढी सर्वाधिक मोजण्यात आली. दिवाळी पूर्व काळात ती ७१ डेसिबल एवढी होती. मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत आणि ज्युनियर केमिस्ट निर्मिती साळगावकर यांच्या पथकाने दिवाळी पूर्व आणि दिवाळी कालावधीत हवेची गुणवत्ता तपासण्याबरोबरच ध्वनीचे मापन केले. शहरात २०२२ मध्ये दिवाळीपूर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक १३५ तर, दिवाळी काळात १९७ इतका होता. २०२३ मध्ये दिवाळी पूर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक ११५, दिवाळी काळात १८७ इतका होता. २०२४ मध्ये दिवाळी पूर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक १२७, दिवाळी काळात १९० इतका नोंदविण्याच आला आहे. तसेच शहरात २०२२ मध्ये दिवाळी पूर्व काळात ध्वनी पातळी ६७ डेसीबल , दिवाळी काळात ८९ डेसीबल इतकी होती. २०२३ मध्ये दिवाळी पूर्व काळात ध्वनी पातळी ६८ डेसीबल, दिवाळी काळात ७० डेसीबल इतकी होती.२०२४ मध्ये दिवाळी पूर्व काळात ध्वनी पातळी ७१ डेसीबल, दिवाळी काळात ८४ डेसीबल आहे.

**दोन वर्षांच्या तुलनेत प्रदूषणात घट झाल्याचा दावा**

# पाण्याच्या टाकीत पडून चिमुकल्याचा मृत्यू

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

- **पालिकेच्या निष्काळजी अधिकारी, कर्मचाऱ्यांना गुन्हा दाखल**

गोरक्षनाथ पालवे उद्यानामध्ये खेळताना सिद्धार्थ विशाल उघडे या मुलाचा झाकण नसलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये पडून मृत्यू झाला. शनिवारी रात्री घडलेल्या या घटनेप्रकरणी वाशी पोलिसांनी नवी मुंबई महापालिकेच्या वाशी विभागातील उद्यान निरीक्षक, ठेकेदार, सुरक्षारक्षक, तसेच उद्यान विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांच्याविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

विशाल उघडे हे वाशी सेक्टर-१५मध्ये कुटुंबासह राहतात. शनिवारी रात्री ते आपल्या सिद्धार्थसोबत या उद्यानात गेले होते. ते उद्यानात चालत असताना, सिद्धार्थ इतर मुलांसह लपाछपी खेळत होता. खेळताना सिद्धार्थ उद्यानातील झाकण नसलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये पडला. बराच वेळ झाल्यानंतर सिद्धार्थ दिसत नसल्याने विशाल उघडे यांनी संपूर्ण उद्यानात मुलाचा शोध घेतला, मात्र तो कुठेच सापडला नाही. अखेर उद्यानाच्या कोपऱ्यात असलेल्या उघड्या पाण्याच्या टाकीमध्ये सिद्धार्थ तरंगताना आढळून आला. विशाल यांनी टाकीत उडी मारून सिद्धार्थला बाहेर काढले आणि तात्काळ रुग्णालयात नेले. मात्र, त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

उद्यानातील पाण्याची टाकी निष्काळजीपणे उघडी ठेवण्यात आल्याने ही दुर्घटना घडल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे महापालिकेच्या उद्यान विभागातील कर्मचारी, अधिकारी, ठेकेदार यांना या दुघर्टनेसाठी जबाबदार ठरवून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी रिपाइं पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी लावून धरली. गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृत सिद्धार्थवर अंत्यसंस्कार न करण्याची भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली. अखेर वाशी पोलिसांनी महापालिकेच्या वाशी विभागाचे उद्यान निरीक्षक, ठेकेदार, सुरक्षारक्षक, उद्यान विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांच्या विरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नवमतदार बाजी पलटवणार

**। पालघर । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीनंतर एक लाख ४३ हजार ५५२ मतदार वाढले आहेत. नालासोपारा आणि बोईसर विधानसभा क्षेत्रातील मतदारांची सर्वाधिक वाढ दिसून येत आहे. १७ ते १९ ऑक्टोबर या तीन दिवसांमध्ये २६ हजार मतदारांची वाढ झाली. सहा विधानसभा क्षेत्रात आता एकूण २२ लाख ९२ हजार ६६ मतदारांची नोंद झाली आहे. त्यामुळे नवीन मतदार निर्णायक ठरणार असून, बाजी पलटवणार अशी चर्चा आहे.

पालघर जिल्ह्यात ११ लाख ८७ हजार ५८९ पुरुष, तर ११ लाख चार हजार महिला आणि २३१ तृतीयपंथी मतदार आहेत. नालासोपारा मतदारसंघामध्ये सर्वाधिक सहा लाख आठ हजार ५२६ मतदार आहेत. त्या खालोखाल बोईसर मतदारसंघात चार लाख ११ हजार ३२९ मतदार आहेत.

वसई मतदारसंघात तीन लाख ५४ हजार ६५२ मतदार, विक्रमगड मतदारसंघात तीन लाख १७ हजार ७४१, डहाणूमध्ये तीन लाख एक हजार २३९, तर पालघर मतदारसंघात दोन लाख ९८ हजार ५७९ मतदार २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

विशेष म्हणजे, लोकसभा निवडणुकीनंतर नालासोपारा मतदारसंघात ५१ हजार मतदारांची वाढ झाली, तर बोईसरमध्ये २७ हजार, डहाणूमध्ये १८ हजार, विक्रमगड, पालघर आणि वसई या मतदारसंघात प्रत्येकी सुमारे १६ हजार मतदार वाढलेले दिसून येत आहेत. या सर्व मतदारसंघात मतदारसंख्या तीन ते साडेतीन हजारांनी वाढल्याचे दिसून आले. नालासोपारा मतदारसंघात नऊ हजार ९०७ मतदार वाढल्याचे दिसून येत आहे. ४६ हजार नवमतदारांची नोंद झाली असून, नोंदवलेल्या मतदारांपैकी १७ हजार ४३२ जण अपंग असून त्यांना आवश्यक वाटल्यास कागदपत्रांची पूर्तता केल्यास त्यांना घरी मतदान करण्याची सुविधा पुरविली जाणार आहे. त्याचप्रमाणे सैन्यामध्ये कार्यरत असणारे ३२६ मतदार असून, विक्रमगडमध्ये १२१, तर नालासोपाऱ्यामध्ये ८३ जणांचा समावेश आहे.

# साहेब, निवडणूक ड्यूटी रद्द करा!

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

## निवडणूक विभागाकडे ४०० अर्ज दाखल

विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान २० नोव्हेंबरला होणार आहे. या निवडणुकीच्या कामासाठी विविध सरकारी विभागातील सुमारे साडेसात ते आठ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे प्रशिक्षणही झाले आहे. तरी जिल्ह्यात त्या-त्या विभागात कोणत्याही केंद्रावर नियुक्ती होणार असल्याने अनेकांना निवडणूक ड्यूटी नावडती झाली आहे. ही ड्यूटी रद्द व्हावी, यासाठी ४०० जणांनी वैद्यकीयसह अनेक कारणे दिली आहेत.

दरम्यान, कर्मचाऱ्यांनी केलेल्या अर्जांमध्ये कोणाला उच्च रक्तदाब, मधुमेह, निवृत्ती आली आहे, मुलाचे-मुलीचे लग्न आहे, काही महिलांनी गर्भवती असल्याचे कारण दिले आहे. आज निवडणूक विभाग यावर निर्णय घेणार आहे. जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया अगदी पारदर्शक व्हावी, यासाठी जिल्हा निवडणूक विभाग आणि प्रशासनाचा प्रयत्न आहे. जिल्ह्यात सुमारे साडेतेरा लाखांच्या दरम्यान मतदार आहेत. सतराशेच्यावर मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रावर सुरळीत मतदान प्रक्रिया होण्यासाठी निवडणूक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



जिल्हा निवडणूक विभागाने विविध शासकीय विभागातील सुमारे साडे ७ ते ८ हजार कर्मचाऱ्यांची निवडणूक कामासाठी नियुक्ती केली आहे. त्यासाठी या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. नियुक्त करण्यात आलेल्या या कर्मचाऱ्यांची जिल्ह्यातील त्या-त्या विभागात कोणत्याही मतदान केंद्रावर नियुक्ती होणार आहे. जिल्ह्यातील सुमारे ४०० शासकीय कर्मचाऱ्यांनी निवडणुकीची ड्युटी रद्द व्हावी, यासाठी अर्ज केले आहेत. या अर्जामध्ये अनेकांनी विविध वैद्यकीय कारणे दिली आहेत. निवडणूक विभाग वैद्यकीय कारण आणि वस्तुस्थितीचा विचार करून यावर निर्णय घेणार आहे. खरे कारण असेल तर अर्ज मंजूर केला जाईल अन्यथा फेटाळला जाईल, असे निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले.

# ठाणे विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ४६ केंद्रे

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

## १५९ सोसायटीमध्ये ३३७ मतदान केंद्रे

**सोसायटीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचा मतदानातील टक्का वाढवा, यासाठी सोसायटीतच मतदान केंद्रांची उभारणी करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. १५९ सोसायटींमध्ये ३३७ मतदान केंद्रांची उभारणी केली असून, ५३ स्लम परिसरात २५२ मतदान केंद्रे उभारली आहेत.**

लोकसभा मतदानाच्या वेळी झालेला विलंब, मतदान केंद्रांवर लागलेल्या लांबच लांब रांगा यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागले होते. ही बाब लक्षात घेत ठाणे जिल्हा निवडणूक विभागाने विधानसभा निवडणुकीच्या वेळी असा गोंधळ पुन्हा उडू नये, यासाठी मतदान केंद्रांच्या संख्येत २९७ ने वाढ केली आहे. यामध्ये सर्वाधिक ४६ मतदान केंद्रे ही ठाणे विधानसभा मतदारसंघात वाढविण्यात आल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे.

जिल्ह्यात तीन लोकसभा मतदारसंघ तर १८ विधानसभा मतदारसंघ आहेत. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या वेळी वयोवृद्ध मतदारांना होणारा त्रास व त्यांची होणारी गैरसोय लक्षात घेता, दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यावरील मतदान केंद्र हे तळ मजल्यावर आणले होते; मात्र लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रांच्या बाहेर रांगा लागल्याचे चित्र दिसून आले. तर, अनेक मतदान केंद्रांवर मतदारांची संख्यादेखील अधिक असल्याचे समोर आले. यामुळे मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागले होते. याची दखल घेत विधानसभा निवडणुकीत लोकसभा निवडणुकीवेळी झालेल्या गैरसोयीची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी निवडणूक विभागाने मतदान केंद्रांच्या संख्येत २९७ ने वाढ केली आहे. ठाणे विधानसभा मतदार संख्या सर्वाधिक ४६ मतदान केंद्रांची वाढ झाली आहे. मतदान केंद्रांची संख्या पोहोचली सहा हजार ८९४ वर जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांची संख्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी सहा हजार ३९१ इतकी होती. मतदान केंद्रांवर लागणाऱ्या लांबच लांब रांगा, मतदानासाठी लागणारा वेळ, यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागले होते. त्यामुळे यंदा विधानसभा निवडणुकीसाठी २९७ मतदान केंद्रांची वाढ केल्यामुळे जिल्ह्यातील मतदान केंद्रांची संख्या थेट सहा हजार ८९४ वर पोहोचली आहे.

# सुरक्षारक्षक मानधनाविना

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**मुंबई येथील २६/११ च्या सागरी दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणा खडबडून जागी झाली. सागरी किनाऱ्यांवरील सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी पोलिसांच्या मदतीला खासगी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली. परंतु, रात्रीचा दिवस करून काम करणारे सुरक्षा रक्षकांचे मानधन सहा महिन्यांपासून रखडले आहे. गणपती, नवरात्र व दिवाळी मानधनाविनाच गेल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आर्थिक संकट उभे राहिले आहे. याकडे मत्स्य विभाग लक्ष देईल का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.**



मुंबईमधील दहशतवादी हल्ले समुद्रमार्गे झाले आहेत. देशविघातक कारवाया रोखण्यासाठी, किनाऱ्यावरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सागरी सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी गृह विभागाने पावले उचलली. किनाऱ्यांवरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी किनारी सुरक्षा रक्षक नेमण्यास सुरुवात झाली.

रायगड जिल्हा मुंबईच्या अगदी जवळ असल्याने समुद्रमार्गे दहशतवादी हल्ले होण्याचा धोका नाकारता येत नाही. रायगड जिल्ह्यात १९९२ मध्ये श्रीवर्धनमधील शेखाडी येथील सागरी किनारी आरडीएक्स सापडले होते. त्यानंतर काही महिन्यांपूर्वी श्रीवर्धनमध्ये समुद्रमार्गे शस्त्रांचा साठा आढळून आला होता. अशा काळ्या घटनांनी रायगडमधील किनारे परिचित आहेत. रायगड जिल्ह्यातील किनारे सुरक्षित ठेवण्यासाठी पेणमधील दादर, ओएनजीसी पिरवाडी, रेवस जेट्टी, मांडवा परिसरातील आरसीएफची जुनी जेट्टी, मांडवा, नवगाव अलिबाग, रेवदंडा, आग्राव, कोर्लई, बोर्ली मांडला, नांदगाव, एकदरा, राजपुरी, आंबेत, बागमांडला, मांदाड, शेखाडी, जीवना, दिघी पॅसेंजर, दिघी पोर्ट अशा अनेक बंदरांवर खासगी ६९ जणांची नियुक्ती करण्यात आली. पाच सुपरवायझर व ६४ सुरक्षा रक्षक या बंदरांवर रात्रीचा दिवस करून काम करीत आहेत.

समुद्रालगत फिरणाऱ्या संशयित बोटींवर लक्ष देऊन त्याची माहिती स्थानिक पोलिसांना देणे, खलाशी यांचे आधार कार्ड तपासून त्यांची नोंदणी करणे, मासेमारीला जाणाऱ्या बोटींना टोकन देणे, अशी अनेक प्रकारची कामे सुरक्षा रक्षक करीत आहेत.

पोलिसांसह मत्स्य विभागाला मदतीचा हात देणाऱ्या सुरक्षा रक्षकांना चार महिन्यांचे मानधन मिळाले नाही. जून महिन्यापासून हे कर्मचारी मानधनाच्या प्रतीक्षेत आहेत. गणेशोत्सव, नवरात्रौत्सव तसेच आता दिवाळीचा सणही मानधनाविनाच साजरा करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

शासनाकडून निधीच उपलब्ध झाला नसल्याचा फटका या सुरक्षा रक्षकांना बसला आहे. मानधन नसल्याने या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. उसनवारी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागत आहे. त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. याबाबत सुरक्षा रक्षकांना मानधन मिळावा यासाठी शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात आला आहे. त्यांच्याकडून निधी आल्यावर मानधन देण्याची कार्यवाही केली जाईल, असे मत्स्य व्यवसाय विभागाकडून सांगण्यात आले.

### स्टेशनरी खर्चाचाही अभाव

**जिल्ह्यातील २१ ठिकाणी ६९ सुरक्षा रक्षक तीन टप्प्यात काम करीत आहेत. रात्रीच्यावेळी किनाऱ्यांवरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी टॉर्चची गरज असते. तीदेखील त्यांना दिली जात नाही. प्रत्येक महिन्याला स्टेशनरी खर्च देण्याच्या सूचना आहेत. तो खर्चदेखील दिला जात नसल्याचे सुरक्षा रक्षकांकडून सांगण्यात आले आहे.**

> सागरी आतंकवादी हल्ल्यानंतर सुरक्षा रक्षक म्हणून आमची नेमणूक करण्यात आली आहे. किनाऱ्यांवरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्याबरोबरच बोटींना टोकन देणे, त्यांची नोंदणी ठेवण्याचे काम केले जाते. जून महिन्यापासून मानधन दिले नाही. त्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे. कर्जाचे हप्ते थकले आहेत. कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. त्यामुळे तातडीने मत्स्य विभागाने मानधन द्यावे, अशी मागणी आहे.
>
> - सुरक्षा रक्षक, नाव न सांगण्याच्या अटीवरून

## फटाके फोडण्यावरुन हाणामारी; दोघे जखमी

**। रसायनी । वार्ताहर ।**

फटाके फोडण्यावरुन झालेल्या हाणामारीत दोनजण जखमी झाले असून, रसायनी पोलीस ठाण्यात परस्पर विरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत नवीन पोसरी येथील सेवालाल मंदिराजवळ सोमु हेमू राठोड यांचा मुलगा महेश फटाके फोडत असताना ते इकडे तिकडे उडाल्याने त्या गोष्टीचा मनात राग धरून विशाल बाळू चव्हाण,राठोड, देवराज राठोड, वाल्या चव्हाण, भोजराज राठोड आणि तीन अल्पवयीन मुलांनी (सर्व रा. नविन पोसरी-मोहोपाडा, ता. खालापूर) गैरकायदा मंडळी जमवून सोमू याला शिविगाळी दमदाटी करुन मारहाण केली. तसेच विशाल चव्हाण याने सोमू यांच्या डोक्यात लाकडी काठी मारून दुखापत केली, तर दुसऱ्या गटाने दिलेल्या तक्रारीनुसार विशाल चव्हाण याने दिवाळी सणानिमित्त नवीन दुचाकीची पूजा करताना फटाके विशाल याच्या अंगावर आले. त्याबाबत विशालने राठोड यास फटाके लांब फोडा असे बोलले असता शाम राठोड, पवन खुभ्या चव्हाण, सोमू हेमु राठोड, विजय पुन्या राठोड, सावन उभ्या राठोड आणि पाच अल्पवयीन मुलानी गैरकायद्याची मंडळी जमवून विशाल याला शिवीगाळी दमदाटी करुन मारहाण केली. दोन्ही गटाने रसायनी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी तक्रार दाखल केल्यानंतर जिल्हाधिकरी यांनी जारी केलेल्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई महेश धोंडे हे करीत आहेत.

## आगाराला टाळे ठोकण्याचा इशारा

### ■ विभाग नियंत्रकांची मुरुड आगाराला तात्काळ भेट

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड आगारासाठी भंगार गाड्या दिल्याने त्या रस्त्यामध्ये बंद पडत आहेत. परिणामी, मुरुड तालुक्यातील असंख्य प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. याबाबत समाजसेवक अरविंद गायकर यांनी मुरुड आगाराला टाळे ठोकण्याचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने पेण येथील विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी मुरुड आगाराला नुकतीच भेट दिली.

यावेळी समाजसेवक अरविंद गायकर यांच्यासमवेत मुरुड तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष बाबू सुर्वे, भावेश शहा, उत्तम पाटील, सुधीर दांडेकर, सुशील ठाकूर, समीर रांजणकर, देवेंद्र सतविडकर आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी समाजसेवक अरविंद गायकर यांनी विचारले की, गाडीतून धूर येणे, गाडी चारही बाजूने फाटलेली व बुराक पडलेली एसटी याबाबत सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. याबाबत आपण काय कार्यवाही केलीत. यावेळी विभाग नियंत्रक यांनी सांगितले की, अशा गाड्यांवर कार्यवाही करण्यात आली आहे. यावेळी गायकर यांनी सांगितले की, जर जुन्या व जीर्ण झालेल्या गाड्या मुरुड आगाराला मिळत असतील तर प्रवासी वर्गांनी हा त्रास कितपत सहन करावा. या भंगार गाड्यांबाबत मागील दीड वर्षांपासून पत्रव्यव्हार करूनसुद्धा आपण कोणतीही दखल घेतली नाहीत म्हणून मुरुड आगाराला टाळे ठोकण्याचा इशारा द्यावा लागला आहे. रायगड विभागाला लवकरच १०० नवीन गाड्या येत आहेत, अशी आमची माहिती आहे. त्यामधून मुरुड आगाराला १५ गाड्या तरी नवीन देण्यात याव्यात, अशी आग्रही मागणी केली.

## ४७ लाख ८७ हजार रुपयांची फसवणूक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

ब्लॉक ट्रेडिंगमध्ये मार्केटपेक्षा २० ते ३० टक्के कमी दराने स्टॉक ट्रेडिंग करून मिळेल असे खोटे सांगून ४७ लाख ८७ हजार १०० रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पारथा मुखर्जी हे खारघर येथे राहात असून, त्यांना शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन ट्रेडिंग करायची सवय आहे. त्यांना फेसबुक अकाऊंटवर एका कंपनीच्या नावाचे पेज दिसले. त्यावेळी ब्लॉक ट्रेडिंगमध्ये मार्केटपेक्षा २० ते ३० टक्के कमी दराने स्टॉक ट्रेडिंग करून मिळेल असे नमूद केले होते. त्या पेजवर क्लिक केले असता व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप ओपन झाला. त्यानंतर ग्रुपवर चॅटिंग सुरु झाली. ट्रेडिंग कशी करायची यावर माहिती घ्या असे सांगण्यात आले. त्यानंतर व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपचा अ‍ॅडमिन, त्याचा असिस्टंट, कस्टमर सर्विसधारक आणि कंपनीचे हेड समिक दास शर्मा यांनी संगनमत करून मुखर्जी यांना आयपीओ ट्रेडिंगच्या गुंतवणुकीवर रजिस्ट्रेशननंतर ओपन झालेल्या पेजवर वाढीव रक्कम जमा झाल्याचे भासवले आणि वेगवेगळ्या बँक खात्याची माहिती पाठवून त्यावर ४७ लाख ८७ हजार १०० रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पैसे परत मागितले, मात्र पैसे परत दिले नाहीत.



## चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते ‘रायगड मित्र’चे प्रकाशन

### शेकाप नेते जयंत पाटील, अतुल म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वाघ्रण येथून प्रसिद्ध होणाऱ्या त्रैमासिक रायगड मित्रच्या १५ व्या दिवाळी अंकाचे प्रकाशन शेकापच्या रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील तथा चिऊताई यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी शेकाप नेते माजी आमदार जयंत पाटील, पेणचे अतुल म्हात्रे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी वाघ्रण येथील रायगडभूषण पत्रकार आणि रायगड मित्र अंकाचे संपादक दिपक यशवंत पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. दिवाळी अंकाबद्दल थोडक्यात मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संपादक व रायगड मित्र विशेषांकाला शुभेच्छा दिल्या.

या प्रकाश सोहळ्यानिमित्त वाघ्रणचे सरपंच राजेंद्र पाटील, ललिता पाटील, पेढांबे ग्रा.पं. सदस्य रुपेश पाटील, कैलास म्हात्रे, अनिल पाटील, श्रीकांत पाटील, उदय पाटील, जीवन पाटील, किशोर पाटील, भरत पाटील, मुरलीधर पाटील, वाघ्रण येथील शेकाप कार्यकर्ते गिरीश पाटील, संजय पाटील, दयानंद म्हात्रे, तुकाराम पाटील, निरीक्षक प्रमोद पाटील, आदर्श पाटील, क्षितिज विवेक पाटील आदी उपस्थित होते.



## मतदानाबाबत अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण विधानसभा मतदारसंघातील मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. दोन सत्रात आयोजित करण्यात आलेल्या शिबिरातील पहिल्या सत्रात ८८८, तर दुसऱ्या सत्रात ८२६ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, प्रशिक्षण शिबिरादरम्यान गैरहजर अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

उरण विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी जे.ए. कासार व सहायक निर्णय अधिकारी डॉ. उद्धव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात कर्मचारी, अधिकाऱ्यांना निवडणूक कर्तव्यांची माहिती दिली. तसेच ईव्हीएम मशीन हाताळणीबाबतही तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरादरम्यान अनेक अधिकारी अनुपस्थित होते. त्यांच्यावर नियमांनुसार कारवाई करण्यात येईल, अशी माहिती डॉ. उद्धव कदम यांनी दिली.

## विक्रम परमार यांचे निधन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे रायगड जिल्हा अध्यक्ष तथा श्री जय आंबे माता ट्रस्ट मंडळाचे अध्यक्ष, जैन मंदिर पालीचे माजी विश्वस्त, शिवशक्ती स्पोर्ट्स क्लबचे सक्रिय सदस्य विक्रमशेठ परमार यांचे रविवारी (दि. ३) रोजी वयाच्या ५२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन भाऊ व चार बहिणी असा मोठा परिवार आहे.



त्यांच्या अकाली निधनाने पालीत शोककळा पसरली. विक्रम परमार हे पीडित शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी ते शेवटपर्यंत लढत राहिले. त्यांच्या निधनाने शेतकरी बांधवांवरदेखील दुःखाचा डोंगर कोसळला. विक्रम परमार यांच्या निधनाने त्यांचे कुटुंबिय, मित्रपरिवार, हितचिंतक, कार्यकर्ते शोकसागरात बुडाले. सामाजिक, धार्मिक राजकीय चळवळीचीदेखील मोठी हानी झाली असल्याची प्रतिक्रिया अंत्ययात्रेस उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दिली.



● महाजने येथील अर्णव राजेश पाटील याने साकारलेली किल्ल्याची सुंदर प्रतिकृती.



● चौलमळा येथील रुद्र राजेंद्र नाईक या चिमुकल्याने बनविलेला किल्ला.

## बिरवाडी किल्ल्यावर ‘दिवाळी पहाट’

### मजगावच्या श्री शिवभक्त मित्र मंडळाचा स्तुत्य उपक्रम

**। मुरूड शहर । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील मजगाव येथील श्री शिवभक्त मित्र मंडळ मजगाव यांच्यावतीने ‘दिवाळी पहाट’ या कार्यक्रमाचे आयोजन बिरवाडी किल्ल्यावर करून स्थानिकांना अनोख्या पहाटेचे दर्शन घडविले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.



रोहा तालुक्यातील चणेरा बिरवाडी येथील पुरातन किल्ल्यात शिवभक्त मंडळाच्या सदस्यांनी मैदानी खेळांची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थित ग्रामस्थांची मने जिंकली. तसेच त्यांनी प्रथम गडाची स्वच्छता करुन गडपूजन कार्यक्रम करण्यात आले. त्यानंतर भव्य मशाल यात्रा किल्ले बिरवाडी ते मजगाव या मार्गावर काढण्यात आली. या कार्यक्रमास स्थानिक ग्रामस्थांसह मंडळाचे अध्यक्ष, सर्व पदाधिकारी, सदस्य व विशेष म्हणजे शिवकन्याही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## आश्रमात मिठाई वाटप

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

दिवाळी हा सण भारतात मोठ्या स्तरावर साजरा केला जातो. ‘ईट्स प्ले रीड’ अभियानाच्या दृष्टिकोनातूनदेखील हा उत्सव आनंदाने साजरा करण्यात आला. यंदा ही दिवाळी ईट्स प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांचा अभियानासंदर्भातील हेतू घेऊन त्यांच्या राजदूतांच्या माध्यमातून जीवन ज्योती आश्रमात प्रेमळ भेट देण्यात आली.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● अनुभवी/विना-अनुभवी सिव्हील सुपरवायझर पाहिजेत. ९४२३३७७५७२/९०२८४९३४३४

● अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९ वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### चारिझेन व रेड हाऊस फाऊंडेशनची सामाजिक बांधिलकी

## आदिवासी बांधवांना दिली मायेची ऊब

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

**दिवाळी सर्वत्र आनंदाने साजरी होत असताना ज्या वाडी, वस्ती, पाड्यावर दिवाळी साजरी होत नाही, ज्या ठिकाणी दिवाळीनिमित्ताने तसेच दैनंदिन गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने नेहमीच ओढाताण असते, अशा ग्रामीण वाडी-वस्तीवर चारिझेन फाऊंडेशन व रेड हाऊस फाऊंडेशन यांनी आदिवासी बांधवांना ब्लँकेटचे वाटप करुन त्यांनी दिवाळी उबदार केली.**



दिवाळीनंतर थंडीच्या मोसमाला मोठ्या प्रमाणात सुरुवात होते. हिवाळी ऋतूत वाडी वस्तीवर राहणाऱ्या आदिवासी बंधूंना उबदार कपड्यांची आवश्यकता असते. ही बाब लक्षात घेऊन चारीझेन फाऊंडेशन व रेड हाऊस फाऊंडेशनने आदिवासींसाठी उबदार असे ब्लँकेटचे वाटप केले. थंडीच्या दिवसात या दिवाळी भेटीचा आदिवासी बंधूंना निश्चितपणे उपयोग होणार आहे. तालुक्यातील पेणतर्फे तळे आदिवासीवाडी व इतर आदिवासी वाड्यांवर फाऊंडेशनच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

थंडीच्या दिवसांसाठी या उबदार ब्लँकेटचा निश्चितच आदिवासी बांधवांना उपयोग होणार असल्याची भावना वाडी-पाड्यावरील आदिवासी बंधूंनी व्यक्त केली. या ब्लँकेट वाटपासाठी फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन एन.एस. रंधावा, उपाध्यक्ष सतीश काळे, मार्केटिंग हेड राकेश पडवळ, सहकारी किशोर झेमसे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पनवेलमधील कट्टा परिवाराने साकारला पन्हाळा किल्ला

**। पनवेल । वार्ताहर ।**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले किल्ले हे आजच्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहेत. त्यांचे विचार पुढील प्रेरणादायी ठरावे यासाठी पनवेलमधील कट्टा परिवाराच्या वतीने पन्हाळा किल्ल्याची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. कट्टा परिवाराचा हा उपक्रम राबवण्याचा यंदाचे पाचवे वर्ष आहे.

विरूपाक्ष मंदिरासमोर कट्टा परिवार पनवेलतर्फे २०२०पासून अनेक तरुण मुलमुली मिळून किल्ला बनवण्याची परंपरा जोपासत आहेत. त्यानुसार याही वर्षी कट्टा परिवार तर्फे पन्हाळा किल्ला उभारण्यात आला आहे. ह्यासाठी विशेष मेहनत अथर्व गोखले, तन्मय समेळ, सुमेध गाडगीळ यश जोशी ह्याच्यासह कट्टा परिवारातील सदस्यांनी घेतले.

# अल्पवयीन मुलीचे अपनयन

**। पनवेल । वार्ताहर।**

१७ वर्षीय अल्पवयीन तरुणीचे कायदेशीर रखवालीतून फूस लावून अपनयन केल्याची घटना घडल्याने तिचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. राजश्री सुरेश नाईक (१७ वर्ष ४ महिने, रा.शिरढोण) असे या तरुणीचे नाव असून तिला अज्ञात इसमाने कायदेशीर रखवालीतून फूस लावून अपनयन केल्याची घटना घडली आहे. सदर तरुणीचा रंग सावळा, चेहरा गोल, केस लांब, नाक सरळ, अंगात पंजाबी ड्रेस सफेद रंगाचा त्यावर लाल रंगाची फुले असलेला, पायात तपकिरी रंगाची सँडल घातलेली असून तिला मराठी, हिंदी आणि कातकरी भाषा बोलता येते. तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण ९८२३१९३८८८ यांच्याशी संपर्क साधावा.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान १) श्रीमती प्रमोदिनी प्रभाकर म्हात्रे २) श्री. प्रमोद प्रभाकर म्हात्रे ३) श्रीमती अक्षता अशोक पाटील ४) श्रीमती पुजा हेमंत म्हात्रे ५) श्रीमती मानसी मंगेश नाईक सर्व मु. कावीर, पो. बामणगाव ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| कावीर, ता. अलिबाग. | ४६७/१/१ | ०-५६-०० पो.ख. ०-०८-५० एकूण ०-६४-५० | १३-९१ |

वर नमुद केलेल्या मिळकतीपैकी पश्चिम दिशेकडील ०-२०-०० हे. आर मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. ०४-११-२०२४.

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हण आळी अलिबाग

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे आवळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक विजय कुमार पाल वगैरे ६ यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे आवळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ७१ | २ | ०-३०-७० | ०-५० |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन २१ (एकवीस) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०५/११/२०२४
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे -वाली, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरुपात खुष खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन- मौजे वाली, ता. रोहा, जिल्हा रायगड**

| गट नं. | विद्यमान मालक | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ७८७ | सुगंधा घोसाळकर | ८.९०.०० | |
| | | पो.ख. २.९६.०० | |
| | | ११.८६.०० | ६.७० |
| | | पैकी १.००.०० | |
| | | पो.ख. ०.३०.०० | |

वरील वर्णन केलेली मिळकत खुद्द ताबे कब्जा वहिवाटीची निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तर सदर मिळकतीवर कोणाचाही दान, बक्षिस, लिज, मृत्युपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अन्यथा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार त्यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो विद्यमान मालकांचे लाभांत सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ५-११-२०२४

सही/-
**डॉ.ॲड. निहा अनिस राऊत**
लब्बैक ईस्त्राईल आळी, अलिबाग,जि. रायगड
८३७८९६४३३३.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची बागायत जमिन मिळकत श्री. सुर्यकांत विष्णू जोगळेकर, सौ. अपर्णा सुर्यकांत जोगळेकर, श्री. अभिजीत सूर्यकांत जोगळेकर, सर्वजण रा. मु. शिंत्रे गल्ली पो. आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील बागायत जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी, ता.अलिबाग | ५१६/२ | बागायत ०-७८-०० पो.ख. ०-०२-०० एकूण क्षेत्र ०-८०-०० | १६.०५ |

वर नमूद मिळकतीपैंकी दक्षिणेकडील क्षेत्र ०-०५-५८ हे. आर. प्लॉट नं. ८ ही बागायत मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०५/११/२०२४

सही /-
**ॲड. वैभव वसंत पाटील**
मु. नवेदर बेली, पो. कुरूळ,
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

दि. ०४/११/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील

| मालकाचे नाव | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री. दिनेश काळु बुरकुल वगैरे | ३७ | २९ | ०-२८-०० पैकी ०-१४-०० | ०-१२ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजून कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत,
जि. रायगड भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका मुरूड-जंजिरा पैकी मौजे काशिद येथील, खालील वर्णनाची मिळकत काशिद बीच रिसॉर्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे मालकीची बिनशेती मिळकत आहे.

| सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रूपये-पैसे) |
|---|---|---|
| ४५/१/ब | १४७-००-०० | १४७०-०० |

त्याचप्रमाणे सदर बिनशेती मिळकतीवर सदर कंपनीचे रिसॉर्टची विविध बांधकामे, स्विमिंग पूल, क्लब हाऊस वगैरे बांधकामे देखील आहेत.

आमचे अशिलांची सदर कंपनीचे संचालक यांचेबरोबर वर नमूद बिनशेती मिळकत आणि त्यावरील सर्व बांधकामे खरेदी करण्याबाबत बोलणी चालू आहेत. सदर खरेदी व्यवहार ठरविणेपूर्वी वर नमूद सर्व्हे नंबर ४५ हिस्सा नंबर १/ब या बिनशेती मिळकतीमध्ये अथवा त्यावरील बांधकामांमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, सर्व्हे नंबर ४५ हिस्सा नंबर १/ब या बिनशेती मिळकतीमध्ये अथवा त्यावरील बांधकामांमध्ये वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशील ठरविणार असलेल्या प्रस्तावित व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार ठरवतील व पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ०५/११/२०२४

सही /-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग-रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल, कावेरी 'बी' सह. गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे-अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड (नोंदणी क्र. आर. जि.डी./एबीजी/एच.एस.जि./(टी सी) २३०४/२००९) या संस्थेचे सभासद असून सदरची संस्था ही महाराष्ट्र सहकारी सोसायटी अधिनियमाअंतर्गत नोंदणीकृत सोसायटी आहे.

आमचे अशिलांचे वर नमूद सोसायटीची इमारत जीर्ण झालेली असल्याने सदरहू इमारतीच्या विकसनाबाबत आमचे अशिलांची एन.यु. डेव्हलपर्स अँड इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमिटेड या कंपनीसोबत चर्चा सुरु होती. परंतु दरम्यानचे काळात भारत सरकारच्या कंपनी रजिस्ट्रार कार्यालयामार्फत २९-०३-२०२२ रोजी सदरची कंपनी बंद करण्यात आलेली असल्याने सदरहू कंपनीसोबत आमचे अशिलांनी केलेले तोंडी अथवा कागदोपत्री सर्व व्यवहार संपुष्टात आले आहेत. सबब आमचे अशिलांचा एन.यु.डेव्हलपर्स अँड इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमिटेड या कंपनीसोबत आता कोणताही संबंध राहिलेला नाही.

सबब आमचे अशिलांचे मालकीचे जागेबाबत एन.यु.डेव्हलपर्स अँड इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमिटेड या कंपनीसोबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये, तसे केल्यास त्यास आमचे अशील जबाबदार राहणार नाहीत. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आमच्या अशिलांच्या संस्थेची इमारत धोकादायक झाली असल्यामुळे लवकरच पुनर्विकास करणेचा आहे तरी आर्थिक आणि तांत्रिक दृष्टीने सबळ व बांधकामाचा पूर्वानुभव असणाऱ्या इच्छूक विकासकांनी संबंधित कागदपत्रे व इतर तपशील बघण्यासाठी संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांच्याकडे प्रत्यक्ष संपर्क साधावा. त्याकरिता कार्यालयाचा पत्ता खालीलप्रमाणे.

अध्यक्ष/सचिव कावेरी 'बी' सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चेंढरे, गव्हर्नमेंट कॉलनीच्या मागे, पो.ता.अलिबाग, जि. रायगड.

सही/-
**ॲड. उमेश एन. पाटील**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
मु.पो.कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड
पिन. कोड नं. ४०२ २०९
मोबाईल नं. ९८५०६७१९५७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल, कावेरी 'सी' सह. गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे-अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड (नोंदणी क्र. आर. जि.डी./एबीजी/एच.एस.जि./(टी सी) ३५४७/२०१७) या संस्थेचे सभासद असून सदरची संस्था ही महाराष्ट्र सहकारी सोसायटी अधिनियमाअंतर्गत नोंदणीकृत सोसायटी आहे.

आमचे अशिलांचे वर नमूद सोसायटीची इमारत जीर्ण झालेली असल्याने सदरहू इमारतीच्या विकसनाबाबत आमचे अशिलांची एन.यु. डेव्हलपर्स अँड इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमिटेड या कंपनीसोबत चर्चा सुरु होती. परंतु दरम्यानचे काळात भारत सरकारच्या कंपनी रजिस्ट्रार कार्यालयामार्फत २९-०३-२०२२ रोजी सदरची कंपनी बंद करण्यात आलेली असल्याने सदरहू कंपनीसोबत आमचे अशिलांनी केलेले तोंडी अथवा कागदोपत्री सर्व व्यवहार संपुष्टात आले आहेत. सबब आमचे अशिलांचा एन.यु.डेव्हलपर्स अँड इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमिटेड या कंपनीसोबत आता कोणताही संबंध राहिलेला नाही.

सबब आमचे अशिलांचे मालकीचे जागेबाबत एन.यु.डेव्हलपर्स अँड इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमिटेड या कंपनीसोबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये, तसे केल्यास त्यास आमचे अशील जबाबदार राहणार नाहीत. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आमच्या अशिलांच्या संस्थेची इमारत धोकादायक झाली असल्यामुळे लवकरच पुनर्विकास करणेचा आहे तरी आर्थिक आणि तांत्रिक दृष्टीने सबळ व बांधकामाचा पूर्वानुभव असणाऱ्या इच्छूक विकासकांनी संबंधित कागदपत्रे व इतर तपशील बघण्यासाठी संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांच्याकडे प्रत्यक्ष संपर्क साधावा. त्याकरिता कार्यालयाचा पत्ता खालीलप्रमाणे.

अध्यक्ष/सचिव कावेरी 'सी' सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चेंढरे, गव्हर्नमेंट कॉलनीच्या मागे, पो.ता.अलिबाग, जि. रायगड.

सही/-
**ॲड. उमेश एन. पाटील**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
मु.पो.कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड
पिन. कोड नं. ४०२ २०९
मोबाईल नं. ९८५०६७१९५७

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| रफीक अहमद इब्राहिम चौगुले | १६०/२/ड | ००-१३-५० | १-७५ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०५/११/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका मुरूड-जंजिरा पैकी मौजे काशिद येथील, खालील वर्णनाची मिळकत आलम इम्तीयाज पेशईमाम यांचे खुद्द मालकीची आहे.

| सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रूपये-पैसे) |
|---|---|---|
| ४५/३ | १-१५-०० ०-१२-०० १-२७-०० | ००-७८ |

आमचे अशिलांची विद्यमान मालकांबरोबर वर नमूद मिळकत खरेदी करण्याबाबत बोलणी चालू आहेत. सदर खरेदी व्यवहार ठरविणेपूर्वी वर नमूद सर्व्हे नंबर ४५, हिस्सा नंबर ३ या मिळकतीपूर्वी त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, सर्व्हे नंबर ४५ हिस्सा नंबर ३ या मिळकतीमध्ये वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण, साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशील ठरविणार असलेल्या प्रस्तावित व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार ठरवतील व पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ०५/११/२०२४

सही /-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग-रायगड.
मोबाईल : ९२७०१६२९२९

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक सुषमा प्रमोद घरत वगैरे १ यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे,

**मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ८३/१ | ०-९६-७० पो.ख. ०-०४-३० एकुण १-०१-०० यापैकी लिहून देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०-३३-५० हे.आर.चौ.मी. यापैकी विकत दिलेले क्षेत्र ०-१७-३० हे.आर.चौ.मी. | ४-९४ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभूत हक्क हितसंबंधासह मला विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार माझ्याकडे (खरेदीदार यांचेकडे) प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचेवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०५/११/२०२४

अशिलातर्फे
**ॲड. धनश्री रघुनाथ ताम्हाणे**
मु. नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड
मोबा. नं. ९५२७२५५४२०

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका मुरूड-जंजिरा पैकी मौजे काशिद येथील, खालील वर्णनाची मिळकत खुर्शिद इम्तियाज पेशमाम आणि गिता रत्नाकर बंगेरा यांचे खुद्द मालकीची आहे.

| सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रूपये-पैसे) |
|---|---|---|
| ४५/४/अ | ०-१२-६० ०-०७-४० ०-२०-०० | ००-०८ |

आमचे अशिलांची विद्यमान मालकांबरोबर वर नमूद मिळकत खरेदी करण्याबाबत बोलणी चालू आहेत. सदर खरेदी व्यवहार ठरविणेपूर्वी वर नमूद सर्व्हे नंबर ४५, हिस्सा नंबर ४/अ या मिळकतीपूर्वी त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, सर्व्हे नंबर ४५ हिस्सा नंबर ४/अ या मिळकतीमध्ये वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण, साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशील ठरविणार असलेल्या प्रस्तावित व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार ठरवतील व पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ०५/११/२०२४

सही /-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग-रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसने सूचित करण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणे आमचे अशील व मिळकतीचे मालक यांच्यामध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पत्ता मौजे- गौळवाडी, ता.ताळा, जि.रायगड**

| क्र. | गट नं. | एकूण क्षेत्र | मालकाचे नाव | प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | ६४/३ | ०.५५.०० | CHANDRAKANT DHONDU VAJE AND OTHERS | GAVAT |

तिचे कोणतेही भागावर, विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, वारसा हक्क, विक्रीचा करार लीज, चार्ज पोटगी, वहिवाट, इजामेन्तरी या अथवा कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही स्वरुपात सदर मिळकतीची विक्री व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी हरकत अथवा तक्रार हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरुपात कागदपत्र सहित सादर करावे.

मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत तक्रार असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

INDAPUR
दि.०२/११/२०२४

**MR.JAYDIP MAHADIK**
B.A.L.L.B.
ADVOCATE
ऑफिस पता:- ताळाशेत(इंदापूर)
लक्ष्मी निवास,ता.माणगाव, जि रायगड मो.नं.८२९१८७६२९६

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
सहायक निबंधक सहकारी संस्था, अलिबाग कार्यालय
ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग, जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ Email ID : arcsalibag@gmail.com
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचेसमोर

६८१
अर्ज क्रमांक ८९/२०२३

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग.. — अर्जदार
तर्फे व्यवस्थापक, सौ. आशा सुरेश राणे. शाखा-वावे

विरुद्ध

१. श्री. नामदेव यल्लप्पा निकम
मु.पो. रुम नं. ७ श्रीपाद हो.सोसा.कॅनरा बँकेच्यामागे विद्यानगर
ता.अलिबाग, जि. रायगड
२. श्री. रावजी मंगल हरिजन — प्रतिवादी
मु.पो. धावीर रोड, धावीर मंदिराच्या बाजूला ता. रोहा, जि. रायगड
३.श्री. सुरेंद्र शंकर नागलेकर
मु.पो.नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमचे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु. ९६,८००/- साठीचा अर्ज.**

ज्या अर्थी कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबागतर्फे व्यवस्थापक, सौ. आशा सुरेश राणे, शाखा-वावे यांनी दिनांक २०-०८-२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये ९६,८००/(अक्षरी रुपये शहाण्णव हजार आठशे मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक २०-०८-२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक २ व ३ बजाविली गेली नाही. त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २५-११-२०२४ रोजी दिवसाचे दुपारी १२.३० वा. सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मणआळी, पो.ता. अलिबाग, जि.रायगड पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वत:हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

याकामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्वीकारली आहेत असे गृहीत धरुन, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २८-१०-२०२४

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
सहायक निबंधक
सहकारी संस्था अलिबाग

# हुलाहुपमध्ये १८ मिनिटांत ५२१ गिरक्या

## लहानग्या सईचा 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'; बुद्धिमत्तेचा उमटविला ठसा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
**माणगाव तालुक्यातील विद्यार्थी आणि खेळाडू आता आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत आपल्या खेळाचा आणि बुद्धिमत्तेचा ठसा उमटवित आहेत. आपली कीर्ती सातासमुद्रापार पोहोचावी यासाठी कसून मेहनत घेत आहेत. अशाच एका माणगाव येथील भादाव गावातील सई सतीश तळकर या सात वर्षांच्या लहानगीने हुलाहुपमध्ये नव्या विक्रमाची नोंद केली आहे. सईने स्वतःला गिरकी घेत स्वतःभोवती अँटिक्लॉक प्रमाणे रिंग फिरवण्याच्या प्रकारात 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये आपले नाव कोरले आहे. तिने १८ मिनिटे ९ सेकंदात हुलाहुप करीत ५२१ गिरक्या घेऊन भारतीय विक्रम प्रस्थापित केला आहे.**

सई तळकर ही माणगाव शहरातील भादाव या छोट्याशा खेड्यात राहात असून, ती रायगड जिल्हा परिषद शाळेत इयत्ता दुसरीत शिक्षण घेत आहे. तिचा लहान भाऊ स्वस्तिक याने भाऊबीज म्हणून हुलाहुप करण्यासाठी एक गोल रबरी रिंग आणून दिली होती. यावर ती दररोज नित्य नियमाने सराव करीत होती. यानंतर तिने १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी रोजी शाळेत आपली कला सादर केली होती. यावेळी गावातील लोकांचा चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळाल्याने सई आणि तिच्या आई-वडिलांचा उत्साह वाढला होता.

दरम्यान, या कलाविष्काराची सईला गोडी लागली आणि ती अतिशय वेगाने कमरेभोवती रिंगची गोल फिरकी घेत असल्याचे आईवडिलांच्या लक्षात आले. यानंतर तिच्या आईने




मोबाईलवरून हा नृत्यप्रकार शोधून 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' यांच्याशी संपर्क साधला होता. तिच्या या गिरकी नृत्याचा व्हिडिओ संस्थेला पाठविला. यानंतर संस्थेने खातरजमा केल्यानंतर तीन महिन्याने सई हिने हुलाहुपमध्ये सर्वोत्तम कामगिरी करून राष्ट्रीय विक्रम नोंदविला आहे, असे कळविण्यात आले. यावेळी संस्थेने सन्मानित केलेल्या सन्मान पत्रात 'सई ही घड्याळाच्या काट्याप्रमाणे वेगाने फिरते' अशा शब्दात गौरव केला आहे.

यावेळी लहानग्या सईला सुवर्णपदक, सन्मानपत्र आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड २०२४ च्या भारतीय विक्रमांचे पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले आहे. सईने माणगावसह रायगड जिल्हा व महाराष्ट्राचे नाव देशात उंचावले आहे.

सईच्या यशाबद्दल माणगावचे उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते विजय मेथा, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी उपनगराध्यक्ष राजेश मेहता व अरुण पवार यांनी सई तळकरचे कौतुक करीत तिला शुभेच्छा दिल्या आहेत. आता सईचे लक्ष लिम्का आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डकडे लागून राहिले आहे.

# महाराष्ट्र कबड्डी लीग मे महिन्यात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने मे २०२५ मध्ये महाराष्ट्राची कबड्डी लीग घेण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी दिली आहे.

पुणे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात २३ ऑक्टोबर रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत या विषयावर धोरणात्मक चर्चा करून मंजुरी घेण्यात आली होती. याबाबत चांदेरे यांनी सांगितले की, लीगकरिता पुरुष आणि महिलांचे असे एकूण १६ संघ तयार करण्यात येतील. यासाठी खेळाडूंची लिलाव प्रक्रिया राबवण्यात येईल. राज्यातील प्रो कबड्डी लीग खेळलेल्या खेळाडूंचाही या लीगमध्ये समावेश असेल. इतर राज्यांतील एका खेळाडूला प्रत्येक संघात स्थान देण्यात येईल. राज्यातील पुणे आणि मुंबई या दोन शहरांत ही स्पर्धा घेण्यात येईल. स्पर्धा साधारणतः पुढील वर्षाच्या मे महिन्यात घेण्याचा संघटनेचा मानस आहे. लीगचे नियम आणि अटी लवकरच निश्चित करण्यात येणार आहेत. तसेच यापुढे खासगी संस्थांना कबड्डी लीग घेण्यासाठी राज्यात परवानगी देण्यात येणार नसल्याचेही चांदोरे यांनी सांगितले आहे.

# 'आत्मपरीक्षणाची गरज'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
भारताने न्यूझीलंड विरूद्धचा अंतिम सामना २५ धावांनी गमावला. भारताच्या घरच्या मैदानावरील या लाजिरवाण्या पराभवानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने भारतीय संघाला खडे बोल सुनावले. सचिनने ट्वीट करत सांगितले की, घरच्या मैदानावर ३-० ने हार, हा पराभव पचवणे कठीण आहे आणि भारताला आत्मपरीक्षणाची गरज आहे.



# रेवदंड्यात रंगले कुस्त्यांचे सामने

■ **शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते शुभारंभ**

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील रेवदंडा हायस्कूलच्या पटांगणात श्री छत्रपती शिवाजी मंडळ रेवदंडा-चौल यांच्यावतीने ६९ वी पारंपरिक कुस्ती स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी (दि.१) करण्यात आले होते. या स्पर्धेत खुल्या गटात वाडगाव आखाडा प्रथम क्रमांकाचा विजेता ठरला. तसेच, आंदोशी आखाडा द्वितीय, तर बेलोशी आखाडा तृतीय क्रमाकांचा मानकरी ठरला आहे.

या कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री छत्रपती शिवाजी मंडळाचे अध्यक्ष सुरेश खोत, हेमंत गणपत, शरद वरसोलकर, सदाशिव मोरे, रायगड जिल्हा व अलिबाग तालुका कुस्ती संघटना अध्यक्ष जयेंद्र भगत तसेच भालचंद्र गुरव, अजित पाटील, चंद्रकांत धाटावकर, बाळू नवखारकर, महेश ठाकूर, जयंत शिंदे आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थिती होती.

या कुस्ती स्पर्धेत वाडगाव, आंदोशी, बेलोशी, वळवली, यशवंतखार असे आखाडे सहभागी झाले होते. यामध्ये खुल्या गटात एकूण ४५ कुस्त्या तर प्रेक्षणीय १५ कुस्त्या खेळविण्यात आल्या होत्या. स्पर्धेत पंचाचे काम राष्ट्रीय पंच रवींद्र घासे, वैभव मुकादम, सुधाकर पाटील, वासुदेव पाटील, मिलिंद भगत, संदीप मोरे यांनी पाहिले. तर टाईम किपरचे काम भालचंद्र गुरव यांनी उत्कृष्टरित्या सांभाळले.

# भारतीय संघ पिछाडीवर

**। मॅके । वृत्तसंस्था ।**
मॅके येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या अनधिकृत कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलिया 'अ' संघाने भारत 'अ' संघाचा ७ गडी राखून पराभव केला आहे. या विजयामुळे ऑस्ट्रेलियाने सध्याच्या दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

सामन्याच्या पहिल्या डावात भारतीय फलंदाजांची कामगिरी निराशाजनक होती. अभिमन्यू इसवरन, ऋतुराज गायकवाड, इशान किशन आणि नितीश रेड्डी या प्रमुख खेळाडूंना महत्त्वपूर्ण योगदान देता आले नाही. यामुळे संपूर्ण संघ अवघ्या १०७ धावांवर बाद झाला होता. ऑस्ट्रेलियासाठी ब्रेंडन डॉगेटने अप्रतिम गोलंदाजी करत ६ बळी घेतले. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात १९५ धावा केल्या आणि ८८ धावांची आघाडी घेतली होती.

यानंतर दुसऱ्या डावात खराब सुरुवात करूनही काही भारतीय फलंदाज फॉर्ममध्ये परतले. साई सुदर्शनने ऑस्ट्रेलियन आक्रमणाचा सामना करत २०० चेंडूंत १०३ धावांची शानदार खेळी केली. देवदत्त पडिक्कलनेही १९९ चेंडूंत ८८ धावा केल्या. मात्र, हे दोन्ही फलंदाज टॉड मर्फीचे बळी ठरले. इशान किशनने ३२ आणि नितीश रेड्डीने १७ धावा केल्या.



# गडकिल्ले स्पर्धेचा निकाल जाहीर



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
उरण तालुक्यातील सारडे विकास मंच आणि कोमणादेवी ऑक्सिजन पार्कतर्फे मुलांना गड किल्ल्यांचे महत्त्व आणि माहिती व्हावी यासाठी गड किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील ५६ स्पर्धकांनी भाग घेतला होता. यावेळी मुरुड-जंजिरा किल्ल्याची प्रतिकृती साकारणारा सुशांत म्हात्रे हा प्रथम क्रमांकाचा, सिंधुदुर्ग किल्ल्याची प्रतिकृती साकारणारा श्रीवेद म्हात्रे हा द्वितीय क्रमांकाचा तर रायगड किल्ल्याची प्रतिकृती साकारणारा ओम पाटील हा उत्तेजनार्थ पारितोषिकाचा मानकरी ठरला आहे.

यावेळी धिरेंद्र ठाकूर यांनी शिवरायांच्या गडकिल्ल्यांची माहिती दिली. तर, किशोर पाटील यांचा 'स्वर हे माझे' हा संगीतमय कार्यक्रम संपन्न झाला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, या स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविणाऱ्या विजेत्या स्पर्धकांची शैक्षणिक फी राकेश कडू (सोनारी) यांच्यामार्फत भरली जाणार आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी निवास गावंड, तुकाराम गावंड, हरिश्चंद्र म्हात्रे, संतोष जोशी, सचिन पाटील, विजय पाटील, प्रशांत म्हात्रे, रणिता ठाकूर, डॉ. कौस्तुभ पाटील, किशोर पाटील, हरीश म्हात्रे, अमोल पाटील, राजेश पाटील, गणेश पाटील, नशीब पाटील, निलेश म्हात्रे, उज्ज्वल पाटील, अदिती पाटील, अपूर्वा पाटील, रिया म्हात्रे, ओम, बबली, आक्षाता यांनी मेहनत घेतली.



# धानकान्हे संघ ठरला विजेता

**। खांब । वार्ताहर ।**
दिवाळी सणाचे औचित्य साधून अलिबाग येथे आदिवासी समाजाच्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. आदिवासी समाजातील तरूणांना कबड्डी खेळाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे. या स्पर्धेत अंतिम सामन्यातील झालेल्या अटीतटीच्या लढतीत गावदेवी धानकान्हे आदिवासीवाडी संघाने मुरूड संघाचा पराभव करीत अंतिम विजेतेपद पटकावले आहे.

गावदेवी धानकान्हे आदिवासीवाडी संघाच्या या यशाबद्दल समाजातील सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तसेच या संघाने कबड्डी क्षेत्रात आपले वर्चस्व कायम राखून विविध स्तरांवर मोठ्या प्रमाणात पारितोषिके पटकावली आहेत.

# भारताचे प्रतिस्पर्धींना दमदार ठोसे

## महिला खेळाडूंकडून पदकांची लयलूट

**। कोलोरॅडो । वृत्तसंस्था ।**
अमेरिकेत पार पडलेल्या १९ वर्षांखालील जागतिक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारतीय खेळाडूंनी प्रतिस्पर्धी खेळाडूंना दमदार ठोसे मारत पदकांची लयलूट केली आहे. भारतीय खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये चार सुवर्ण, आठ रौप्य व पाच कांस्यपदकांवर मोहोर उमटवली आहे. तसेच, महिला विभागात भारतीय खेळाडूंनी उपविजेतेपदाचा मान संपादन केला आहे.

जागतिक बॉक्सिंग अजिंक्यपद या प्रतिष्ठेच्या स्पर्धेमध्ये भारतीय महिला खेळाडूंनी घवघवीत यशाला गवसणी घातली आहे. तीन सुवर्णपदकांसह सात रौप्यपदकांचीही कमाई केली आहे. यातील भारताच्या तीन महिला खेळाडूंनी सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. यात क्रिशा वर्मा (७५ किलो), पार्थवी ग्रेवाल (६५ किलो), वंशिका गोस्वामी (८० पेक्षा किलो जास्त) या भारतीय महिलांनी सुवर्णपदकाचा मान मिळवला आहे. तसेच, पुरुष विभागात हेमंत सांगवान याने ९० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले आहे.



### पदकविजेते भारतीय खेळाडू

**सुवर्णपदक :- क्रिशा वर्मा, पार्थवी ग्रेवाल, वंशिका गोस्वामी, हेमंत सांगवान. रौप्यपदक:- निशा, सुप्रिया देवी, क्रितीका वासन, चंचल चौधरी, अंजली सिंग, विनी, आकांक्षा पी. राहुल कुंडू.**
**कांस्यपदक:- ऋषी सिंग, क्रिश पाल, सुमीत, आर्यन, लक्ष्य राठी.**

# वृद्धिमान साहाचा क्रिकेटला अलविदा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
भारतात सध्या रणजी ट्रॉफी स्पर्धेचा हंगाम सुरू आहे. यादरम्यान आता भारताचा यष्टीरक्षक फलंदाज वृद्धिमान साहा याने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्याने स्पष्ट केले आहे की, चालू रणजी हंगाम त्याची अखेरची स्पर्धा असेल. साहा बंगालसाठी रणजी ट्रॉफी खेळत आहे. साहाने सोशल मीडियावर पोस्ट करत त्याच्या निवृत्तीची माहिती दिली आहे. वृद्धिमान साहाने सोशल मीडियावर पोस्ट करत लिहिले की, क्रिकेटच्या प्रवासाचा आनंद घेतला असून, आता चालू हंगाम माझ्या कारकीर्दीतील अखेरचा असेल. बंगालचे अखेरच्यावेळी प्रतिनिधित्व करणे सन्मानजनक आहे. मी निवृत्त होण्यापूर्वी शेवटचे रणजी ट्रॉफीमध्ये खेळत आहे. या प्रवासाचा भाग झालेल्या सर्वांचे आभार, तुमचा पाठिंबा खूप मोलाचा होता. हा हंगाम आता अविस्मरणीय बनवूया. साहाने अचानक घेतलेल्या निवृत्तीमुळे त्याच्या चाहत्यांना धक्का बसला आहे.



# पुण्याची मुंबईवर मात

**। पुणे । प्रतिनिधी ।**
प्रो-कबड्डी लीगच्या ११व्या हंगामातील ३२ व्या सामन्यात पुणेरी पलटणने यू मुंबाला पराभूत केले आहे. कर्णधार अस्लम इनामदारच्या शानदार सुपर १० आणि गौरव खत्रीच्या हाई फाइव्हच्या जोरावर संघाने मुंबाचा ३५-२८ असा पराभव केला. यासह पुणेरी पलटण संघ आता गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. पुणेरी पलटणच्या या सामन्यात कर्णधार अस्लम इनामदारने सुपर-१० आणि मोहित गोयतने ९ गुण घेतले. तर, गौरव खत्रीने बचावात कहर केला. त्याने एकट्याने सात गुण घेतले. यू-मुंबाकडून अजित चव्हाणने सर्वाधिक रेड पॉइंट घेतले. त्याने एकूण ९ गुण घेतले. मात्र, संघाचा बचाव फसला आणि त्यामुळे संघाला पराभवाला सामोरे जावे लागले.

## जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील अव्वल स्थानात घसरण

# भारतीय संघाचा मार्ग कठीण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
**भारतीय संघावर न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीत २५ धावांवर पराभूत व्हावे लागल्याने व्हाईटवॉशची नामुष्की ओढावली होती. न्यूझीलंड पहिलाच असा संघ ठरला आहे ज्यांनी भारताला मायदेशात ३-० अशा फरकाने कसोटी मालिकेत पराभूत केले. दरम्यान, या लाजिरवाण्या पराभवामुळे भारताचे दुहेरी नुकसान झाले आहे.**



भारताने मालिका गमावण्याबरोबरच जागतिक कसोटी अजिंक्यपद २०२३-२५ स्पर्धेच्या गुणतालीकेतील अव्वल स्थानही गमावले आहे. यामुळे आता भारतीय संघासाठी कसोटी अजिंक्यपदाच्या अंतिम सामन्यात सलग तिसऱ्यांदा प्रवेश करण्याचा मार्ग कठीण झाला आहे.

भारतीय संघ सध्या ५८.३३ सरासरीसह दुसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. तसेच, ऑस्ट्रेलिया सध्या ६२.५० च्या सरासरीसह अव्वल क्रमांकावर आहे. तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या श्रीलंका संघाचे ५५.५६ सरासरी आहे. न्यूझीलंड भारताविरूद्धच्या विजयामुळे ५४.५५ सरासरीसह चौथ्या क्रमांकावर आहेत, तर पाचव्या क्रमांकावर दक्षिण आफ्रिका असून त्यांची सरासरी ५४.१७ आहे. यामुळे सध्या पहिल्या दोन क्रमांकासाठी हे पाच संघ शर्यतीत आहे. भारतीय संघ सध्या गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर आहे, परंतु त्यांची आता २०२३-२५ मधील एकच मालिका उरली आहे. भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. यामुळे भारतीय संघ जास्तीत जास्त ६९.२३ सरासरीपर्यंत पोहचू शकतो. दरम्यान, जर भारताने आता ऑस्ट्रेलियाला ४-० अशा फरकाने पराभूत केले, तरच त्यांना थेट अंतिम सामन्यात पोहचता येणार आहे. पण असे झाले नाही, तर त्यांना दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि श्रीलंका या संघांच्या उर्वरित मालिकांच्या निकालावर अवलंबून रहावे लागणार आहे.

# भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेत दाखल




**। डर्बन । वृत्तसंस्था ।**
भारतीय संघाला रविवारी (दि.३) न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकेत ३-० अशा लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. हा पराभव होत असतानाच भारताचा टी-२० संघ दक्षिण आफ्रिकेला रवाना झाला आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यात भारतीय संघाला सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात ४ सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. या मालिकेसाठी भारतीय संघ डर्बन येथे पोहोचला आहे. यावेळी प्रभारी प्रशिक्षक म्हणून व्हीव्हीएस लक्ष्मण भारतीय संघासोबत दक्षिण अफ्रिका दौऱ्यावर गेल्याची माहिती मिळत आहे. भारताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्याचा सपोर्ट स्टाफ भारतीय कसोटी संघाच्या आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या तयारीत व्यस्त असणार आहे, यामुळे लक्ष्मण भारताच्या टी-२० संघासह दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर गेल्याचे कळत आहे.

दरम्यान, भारताला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ८ ते १५ नोव्हेंबर यादरम्यान टी-२० मालिका खेळायची आहे. या मालिकेतील पहिला सामना डर्बनला होईल, तर नंतर भारताला गकेबेहरा, सेंच्युरियन आणि जोहान्सबर्ग येथे सामने खेळायचे आहेत.

### सूर्यकुमारच्या नेतृत्वात मालिका

**भारताचा संघः- सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), रिंकू सिंग, तिलक वर्मा, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, रमणदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, विजयकुमार विशक, आवेश खान, यश दयाल.**

**दक्षिण आफ्रिकेचा संघः- एडन मार्करम, ओटनेल बार्टमन, गेराल्ड कोएत्झी, डोनोव्हन फेरेरा, रिझा हेंड्रीक्स, मार्को यानसेन, हेनरिच क्लासेन, पॅट्रीक क्रूगर, केशव महाराज, डेव्हिड मिलर, मिहलाली एमपोंगवाना, एनकाबा पीटर, रियान रिकेल्टन, एंडिले सिमेलन, लुथो सिपाम्ला, त्रिस्तान स्तब्स.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)